06 TO 12 SEPTEMBER 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 04/09/2021 5:47 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ३६+३७ | सोमवार दि. ०६ सप्टेंबर २०२१ ते रविवार दि. १२ सप्टेंबर २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## जेवणासाठी बोलवणाराच काळ ठरला बलात्कार करून तिचा गळा चिरला

नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

आजकाल माणसाने कोणावरही सहजपणे विश्वास ठेऊ नये. कारण कुठल्या माणसाच्या मनात काय असेल आणि वरवर सोजवळ दिसणारा माणूस ही कधी घात करील याचा नेम नाही. एका ७० वर्षांच्या महिलेची एका २६ वर्षीय तरुणाशी ओळख झाली. त्याने तिला जेवणासाठी बोलावले आणि तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी १५० ते २०० सीसीटीव्ही तपासून अखेर आरोपीला अटक केली. हा आरोपी लातूरचा असून तो कामानिमित्ताने नवी मुंबईत आला होता. ...पान २ वर

# पत्नीने नपुंसक म्हणताच पतीचे डोके फिरले रागाच्या भरात मुलीला नदीत बुडवून मारले



इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

पुरुष म्हटला कि तो स्वाभिमानी आणि काहीसा अहंकारी असतो. त्याला आपल्या पुरुषार्थाचा विलक्षण असा अभिमान असतो. पण नियती मात्र विचित्र असते. प्रत्येक प्राणी मात्रात तिने काहीतरी उणीवा ठेवलेल्या असतात. स्वतःला सर्वगुणसंपन्न समजणाऱ्या पुरुषासाठी काहीना काही उणीव असते आणि तीच पुढे त्याची कमजोरी ठरते. अशावेळी कुणी त्याच्या या कमजोरीवर बोट ठेवले आणि त्याबाबत त्याला हिणवले कि त्याचा पुरुषी स्वाभिमान दुखावतो आणि त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. इचलकरंजी येथून जवळच असलेल्या यळगुड येथे राहणार युवराज साळुंखे हा चांगला चांदी कामगार होता. आर्थिक दृष्ट्याही त्याची स्थिती चांगली होती. मात्र लैंगिक दृष्ट्या तो कमजोर होता. त्यामुळेच दोन लग्न करूनही त्या बायकांना तो मुल देऊ शकला नाही. उलट तो त्यांना संतुष्ट करू शकत नसल्याने दोन्ही बायकांना सोडचिठी देण्याची नामुष्की त्याच्यावर ओढवली. त्यामुळे त्याने एक मुलीची आई असलेल्या घटस्फोटीत महिले बरोबर त्याने तिसरे लग्न केले. मात्र तो नपुंसक असल्याने तिलाही व्यवस्थित शरीरसुख देऊ शकत नव्हता. त्यामुळे त्या दोघांमध्ये भांडणे होऊ लागली. त्याचे मित्रही त्याला चिडवू लागले. त्यामुळे तो मानसिक दृष्ट्या अस्वस्थ झाला. त्यातच त्याच्या तिसऱ्या पत्नीने एकदा भांडणात त्याच्या मर्मावर बोट ठेवीत त्याला नपुंसक म्हणून हिणवले. त्यामुळे तो भयंकर चिडला आणि पत्नीचा राग त्याने तिच्या ९ वर्षाच्या मुलीवर काढला आणि तिला नदीत बुडवून मारले आणि तिच्या आईला म्हणजे त्याच्या पत्नीला संशय येऊ नये म्हणून पोलीस ठाण्यात मुलगी बेपत्ता झाल्याची मिसिंगची फिर्याद नोंदवली. पोलिसांनी या नराधम बापचे पाप शोधून त्याला बेड्या ठोकल्या. या घटनेने परिसरात खळबळ माजली असून या सावत्र बापाला फासावर लटकवा अशी लोक मागणी करीत आहे.



आरोपी युवराज

युवराज सांळुखे हा हुपरी जवळील यळगुड येथे राहयला आहे. हुपरी ही चांदी नगरी असल्याने हुपरी येथे तो चांदी कारागीर म्हणून काम करीत होता. गेल्या १५ वर्षापूर्वी त्याचे लग्न झाले होते. लग्नांतर त्याला दोन तीन वर्ष मुल झाले नाही म्हणून त्याने पहिल्या बायकोला सोडचिठ्ठी देवून दुसरे लग्न केले. ती दुसरी बायको ही त्याच्या बरोबर दोन तीन वर्ष नांदली. तिच्यापासून ही त्याला मुल बाळ झाले नाही म्हणून त्याने तिला ही सोडून दिले. दोन बायकांचा संसार त्याला धार्जीण झाला नाही. दोन लग्न करून देखील युवराज याला मुलबाळ होत नसल्याने घरच्या लोकांकडून त्याला बोलणी खावी लागत होती त्याच प्रमाणे त्याची मित्रात ही कुचेष्टा होत होती. या कारणातून युवराज दारू ही पिऊ लागला होता. दोन लग्न करून ही त्याला मुल बाळ होत नसल्याने त्याने आपली स्वतःची टेस्ट देखील इचलकरंजी आणि कोल्हापूरातील नामवंत डॉक्टराकडून करून घेतली होती. त्या डॉक्टरांनी त्याच्यातच दोष असल्याचे सांगितले होतं. त्याच्यावर उपचार देखील असल्याचे त्यांनी त्याला सांगितले होते. मात्र त्याने डॉक्टरांचा उपचार बंद करून दोन्ही बायकांच्या बरोबर या ना त्या ...पान २ वर



## प्रेमविवाह केल्याने नशिबच फसले सैराट भावाने बहिणीचे कुंकू पुसले





फलटण/क्राईम रिपोर्टर

प्रत्येक माणसाला आपल्या घराची इज्जत प्यारी असते. त्यामुळे आपल्या घरातील महिलेने वाकडे पाऊल टाकू नये असे त्या कुटुंबातील पुरुषांना वाटत असते. फलटण नजीकच्या साखरवाडी येथे एका गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमाच्या बहिणीने पळून जाऊन प्रेमविवाह केला याचा त्या भावाला इतका राग आला कि त्याने बहिणीच्या पतीचे अपहरण करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

फलटण तालुक्यातील साखरवाडी येथे मोन्या निभोरे हा आपल्या कुटूंबासह राहयला होता.तो गुन्हेगारी प्रवृतीचा असल्याने त्याचेवर फलटणसह इतर पोलीस स्टेशनला काही गुन्हे नोंद आहेत.त्याच्या घरी त्याची बहिण ही राहत होती.जिंती येथील शकील शेख नावाच्या तरूणाच्या प्रेमात ती पडली होती.त्या दोघांचे प्रेम बहरत फुलत असताना त्या दोघांनी ही लग्न करण्याचा विचार केलेला होता.त्या दोघांच्या घरातून त्याच्या लग्नाला विरोध होणार हे त्यांनी ग्रहीत धरल्याने गेल्या दीड वर्षापूर्वी त्यांनी घरच्यांचा विरोध पत्करून पळून जावून लग्न केले होते. त्यानंतर ते दोघे ही जिंती येथील विकासनगर येथे राहयला आले.

शकील शेख याने आपल्या बहिणीला पळवून नेल्याची खंत मोन्या निभोरे याला होता. मोन्या हा गुंड आणि गुन्हेगारी प्रवृतीचा असला तरी तो आपल्या बहिणीला आंतरजातीय लग्न करण्यास रोखू शकला नाही त्यामुळे साखरवाडी जिती परिसरात मोन्या याची इज्जत गेली होती.त्याच्या बहिणीने त्याचे नाक कापले असल्याची त्याची भावना झाली होती.त्यामुळे तो बहिणीला पळवून नेलेल्या शकीलवर राग धरून होता.तो त्याला आपला भावोजी मानत नव्हता या कारणातून त्याने बहिणीच्या घरी जावून शकील आणि बहिणीबरोबर एकदा दोनदा भांडणे ही काढली होती. त्यातच मोन्या याच्या बहिणीने लग्नापूर्वीचे आपले नाव बदलून खुशी असे नाव ठेवले होते. तिने लग्नासाठी जात तर बदलली शिवाय नाव ही बदलल्याने तो जास्तच चिडला होता. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. तो बहिणीला त्याच्याबरोबरचे नाते तोडून टाक परत आपल्या घराकडे ये म्हणून सांगत होता. परंतू त्याची बहिण ही शकील याच्या ...पान २ वर

## संशयाच्या भुताने पतीला केले बेजार कोयत्याचे वार करून पत्नीला केले ठार

पुणे/क्राईम रिपोर्टर



मयत गौरी

पती पत्नीचा संसार हा विश्वासाच्या पायावर उभा असतो. पण जेंव्हा या विश्वासाला तडा जातो तेंव्हा मात्र संसार उध्वस्त होतो. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या लोकांचे मानसिक स्वास्थ इतके बिघडलेले असते कि जसजसा पत्नीच्या चारीत्र्यावरील त्याचा संशय वादात जातो, तसतसा तो हैवान होतो आणि मग एकेदिवशी त्याच्या हातून काहीतरी भयानक घडते. पुण्यातील विजयनगर माळवाडीत राहणारा एक सुरक्षा रक्षक पत्नी सतत फोनवर कुणाशी तरी बोलते म्हणून तिच्यावर संशय घेत असे. तिला मारहाण करीत असे आणि एकेदिवशी त्याने भर रस्त्यात पत्नीची कोयत्याने वार करून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

राहुल प्रतापे याचे लग्न गौरी बरोबर गेल्या तीन चार वर्षापूर्वी झाले होते. ते दोघेही विजयनगर माळवाडी पुनावळे भागात पत्नी आई वडिलासह भाडयाने खोली करून राहत होते. राहुल हा एका कंपनीत सुरक्षारक्षक म्हणून काम करीत होता. त्याला चांगला ...पान २ वर



आरोपी राहुल

# मुलाच्या हातून मेला दारुडा पिता गपचूप पेटवली जन्मदात्याची चिता

बीड/क्राईम रिपोर्टर

दारूचे व्यसन असलेला माणूस हा कुटुंबासाठी नेहमीच तापदायक असतो, अशावेळी कुटुंबाची शेतीवाडी आणि इतर संपत्ती जर अशा दारुड्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असेल तर हा माणूस सर्व काही दारूत घालवील अशी कुटुंबाला भीती असते. त्यातून भांडणे सुरु होतात आणि मग याच भांडणात त्या दारुड्या कुटुंब प्रमुखाचा बळी जातो. बीड जिल्ह्यातील पारनेर येथे अशाच एका घटनेत दारुड्या बापाला मुलाने ठार मारले आणि कुणाला संशय येऊ नये म्हणून रातोरात गुपचूप त्याच्या मृतदेहावर अंत्यसंस्कारही करून टाकले. मात्र गुन्हा कधी लपत नसतो. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी मयत इसमाच्या दोन्ही मुलांना आणि त्यांना मदत करणाऱ्या त्यांच्या तीन चुलत्यांना अटक केली.



आरोपी योगेश आणि गणेश



बिड जिल्ह्याच्या पाटोदा तालुक्यातील पारनेर येथे महादेव बलभीम औटे हे शेतकरी रहात होते. पत्नी गंगुबाई, मोठा मुलगा योगेश आणि धाकटा गणेश अशांसह ते रहात होते. पत्नी गंगुबाईला पक्षाघात झालेला असल्याने ती अंथरुणालाच खिळून होती. मोठा मुलगा पुणे येथे नोकरीला होता. मात्र लॉकडाऊन कालावधीत त्याची नोकरी गेली. त्यामुळे तो गावी पारनेर येथे आला होता. महादेव औटे व त्यांचा मोठा मुलगा योगेश या दोघांना दारु पिण्याचे व्यसन होते. या परिवाराकडे बारा एकर जमीन होती. या जमीनीची वाटणी अद्याप झालेली नव्हती. त्यामुळे घरात कलह सुरु होता. तशातच महादेव औटे यांना दारु पिण्याचा नाद होता. हाती पैसे आले म्हणजे ते दारु पिण्यास जात होते. त्यांचा हा दारुवर पैसे खर्च करण्याचा नाद घरातील सदस्यांना आवडत नव्हता. ...पान ६ वर

## बालिकेचे अपहरण करून त्या फसल्या वेड्या पोलिसांनी घातल्या सासू आणि सुनेला बेड्या



औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

सध्याच्या विज्ञान युगात मुलगा आणि मुलगी असा काहीच फरक केला जात नाही. कारण आजकाल स्त्रिया सुधा पुरुषाच्या खांद्याला खांदा लाऊन काम करतात आणि म्हातारपणी आपल्या आई वडिलांना आधार देऊ शकतात. पण तरीही काही लोकांना मुलीचे जन्माला येणे आवडत नाही. मात्र जालना येथे उलट झाले. मुलाच्या पाठीवर मुलगी व्हावी असे एका इसमाला वाटत होते. पण मुलगाच झाला. त्यामुळे तो पत्नीचा छळ करू लागला. अखेर मुलीसाठी त्या महिलेला आपल्या सासूच्या मदतीने एका लहान मुलीचे अपहरण करावे लागले. मात्र हा गुन्हा करणाऱ्या या सासू सुनेला पोलिसांनी शोधून काढले आणि त्यांना बेड्या ठोकल्या.

पहिल्या मुलानंतर आता मुलगी झाली पाहीजे अशी जालना येथील एका दाम्पत्याची अपेक्षा होती. मात्र ...पान ६ वर

## मित्राचा विश्वासघात करून पत्नीलाच पटवले भांडे फुटताच मित्राला आपल्या मार्गातून हटवले





उल्हासनगर/किरण तेलगोटे

आजकाल मैत्री करताना प्रत्येक मित्राने सावध असायला हवे. कारण मित्राची कधी नियत फिरेल याचा नेम नाही. खास करून काही लंपट लोक मित्राच्या घरीदारी जाऊन त्याच्या पत्नीवर वाईट नजर ठेवतात आणि तिला आपल्या जाळ्यात ओढून तिच्याशी अनैतिक संबंध ठेऊन मैत्रीला लावतात उल्हासनगरमध्ये शेजारी राहणाऱ्या मित्राने त्याच्या मित्राच्या पत्नीला पटवले आणि त्यांचे अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र दोघांचे फोनवरून तासंतास बोलणे होत असल्याने त्या महिलेच्या पतीला संशय आला आणि पती पत्नीमध्ये भांडणे होऊ लागली शेवटी मित्राच्या पत्नीच्या सहवासाला चटावलेल्या मित्रानेच आपल्या साथीदाराच्या मदतीने मित्राची हत्या केली व मृतदेह तलावात फेकून दिला. या प्रकरणी पोलिसांनी कौशल्याने तपास करून आरोपींना अटक केली आहे.

सोमवारी चिंचपाडा परिसरात असणाऱ्या गावदेवी तलावात तरंगलेल्या अवस्थेत सापडलेल्या मृतदेहाची ओळख टॅट्यू वरून पटली आहे. हा मृतदेह नवीमुंबई मधील नाका कामगाराचा असून त्याचे अपहरण करून हत्या केल्याचा गुन्हा विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता.सोमवारच्या रात्री तलावात एका अनोळखी इसमाचा ...पान ६ वर

## दारुवरून झालेला वाद प्राणावर बेतला दोन मित्रांनीच मित्राचा जीव घेतला

मिरज/क्राईम रिपोर्टर



दारूची नाश एकदा का माणसाच्या डोक्यात गेली कि मग त्याचा स्वतःवर ताबा राहत नाही. मित्रांच्या दारूच्या पार्ट्यांमध्ये दारू जास्त झाल्यावर नेहमीच काहीना काही कारणावरून वाद होऊन त्यातून हाणामारी होत असते. मिरज नजीकच्या भोसे येथे असेच घडले. दारूच्या पार्टीत तीन मित्रांमध्ये दारू कमी पडल्यावरून वाद झाला आणि तो वाद इतका वाढला कि दारू आणायला गेलेल्या मित्रांनी दारू आणली नाही म्हणून त्यांना शिवीगाळ आणि मारहाण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दारुड्याला त्याच्या दोन मित्रांनी रागाच्या भरात ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

मिरज-पंढरपूर रस्त्यावरील भोसे येथे दत्तात्रय झांबरे हा युवक आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. त्याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने कामाचे मिळालेले पैसे तो दारूत खर्च करीत होता.तो कुपवाड एमआयडीसीतील एका कारखान्यात कामाला होता.परंतू त्याचे कामावर लक्ष नव्हतेच तो सदा न कदा दारूच्या नशेतच असायचा. काम कमी पण दारू जास्त पिणे. ...पान ६ वर

## वादामुळे संसारात काहीच नाही उरले पत्नीने पतीला ठार मारून घरात पुरले



मुंबई/राजेंद्र वेदांते

पती पत्नीचे नाते हे विश्वासावर अवलंबून असल्याने दोघांनीही एकमेकांचा विश्वास जपणे गरजेचे असते. पण कधी कधी परस्परांमध्ये अविश्वास निर्माण होतो आणि त्यातून वाद सुरु होतात आणि हे वाद जेंव्हा विकोपाला जातात तेंव्हा त्यातून सुडाची भावना जन्म घेते आणि मग ती दोघं एकमेकांच्या जीवावर उठतात. मुंबईच्या कुर्ला भागात राहणाऱ्या एका जोडप्यात असाच वाद होता. त्यातून नेहमी भांडणे व्हायची आणि याच भांडणाला कंटाळून पत्नीने आपल्या नातेवायीकांच्या मदतीने पतीला ठार मारून घरातच पुरले आणि पती बेपत्ता असल्याची पोलिसांकडे फिर्याद नोंदवली. पण पोलीस तपासात पत्नीचा बनाव उघडकीस आला आणि या खुनाला वाचा फुटली. पोलिसांनी आरोपी पत्नीसह ७ जणांना अटक केली.



मयत दिपक

एका महिलेने आपल्या पतीचीच हत्या केली. त्याचा मृतदेह घरातच गाढला. त्यानंतर ती काहीच घडलं नाही, आपल्याला माहिती नाही, अशा आवेशात पोलीस ठाण्यात जावून पती मिसिंग असल्याची तक्रार देवून आली. पण पोलिसांनी तपासाअंती तिचं बिंग अखेर फोडलंच. दीपक सांगळे नावाचा व्यक्ती गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता आहे. तो अनेक दिवासांपासून घरी आलाच नाही, अशी तक्रार ...पान ६ वर

पान १ वरून....

## पत्नीने नपुंसक म्हणताच पतीचे डोके ...

कारणातून भांडणे काढून त्यांना सोडचिठ्ठी देऊन रिकामा झाला. त्याने आपल्या एका मित्राला आपली कर्म कहाणी सांगून आपल्या बरोबर कायम राहणेसाठी कोण बाई मिळते का बघ असे सांगितले. तो मित्र त्याचा जवळचा असल्याने त्याने ही तुझ्याबरोबर एक बाई लग्न करून राहयला तयार आहे. तिला तिच्या नवऱ्यापासून एक मुलगी आहे. त्या मुलीसह तू तिचा स्विकार करणार असशील तर मी तुझी भेट तिच्याबरोबर घालून देईन असे सांगितले. दोन बायकांना त्याने सोडचिठ्ठी दिल्याने त्याला आता आधाराची गरज होती. युवराज याने या गोष्टीवर बरेच दिवस विचार करून मी त्या माहिलेबरोबर लग्न करण्यास आणि तिच्या मुलीचा स्विकार करण्यास तयार आहे असे त्याने आपल्या मित्राला सांगून ठेवले. त्यानंतर त्या मित्राने गेल्या तीन वर्षापूर्वी त्या महिलेची इचलकरंजी येथे ती राहत असलेल्या जामदार मळ्यात त्याची भेट घालून दिली. ती विवाहित महिला ही देखणी आणि सुंदर असल्याने युवराजच्या मनात ती बसली. ती इचलकरंची येथे एका गारमेंट फॅक्टरीत कामाला जात होती. तिला प्रणाली नावाची मुलगी होती. त्या महिलेचा तिच्या नवऱ्याशी घटस्फोट झाला असल्याने तिला ही एका जोडीदाराची गरज होती. त्या दोघांच्यात आणि जवळच्या नातलगामध्ये विचार विनिमय होऊन त्या महिलेबरोबर युवराज याने तिसरे लग्न करून प्रणाली सह तिला आपल्या जीवानात स्विकारले. आता ते दोघे नवरा बायको आणि प्रणाली ही त्याची मुलगी म्हणून यळगुड येथे राहू लागले. युवराज हा चांदी कामगार असल्याने त्याची तिसरी बायको ही त्याचे बरोबर हुपरी येथे चांदी कामगार म्हणून काम करू लागली. त्या दोघांच्या लग्नाला दोन वर्ष झाली होती.त्या महिलेला प्रणाली ही मुलगी असल्याने तिला दुसरे अपत्य हे युवराजकडून नकोच होते. तसे तिला ही युवराज विषयी माहिती असल्याने तिने त्याच्याकडे दुसऱ्या अपत्या विषयी कधी ही चर्चा केली नाही. पण बायका बायकात कधी ही मुलाविषयी चर्चा ही होत असते. लग्नाला दोन वर्ष झाली तरी युवराज तुला मुल का देत नाही असे तिला नात्यातील एका महिलेने विचारले त्यावेळी ती गप्प बसली होती. त्या महिलेने युवराजच्या तिसऱ्या बायकोला सांगीतले की, तुझा नवरा तुला मुल बाळ देऊ शकत नाही. तो नपुंसक आहे. खरे तर ही गोष्ट युवराजच्या तिसऱ्या बायकोला माहित होती.पण ती त्या नात्यातील बाईला स्पष्ट सांगू शकत नव्हती. तर दुसरीकडे चार मित्रात ही युवराजला तिसऱ्या लग्नाविषयी टोमणे मारले जात होते. दारू पिण्याच्या पार्टीत तर एकदा युवराजच्या मित्राने त्याची खिल्ली उडवत अरे यार तू तर तयार सटच घेऊन आला आहेस. त्यामुळे तुला जास्त गुडगे फोड करावी लागत नाही असे म्हटले होती.ही गोष्ट युवराजच्या जिव्हारी लागली होती. त्यानंतर तो या ना त्या कारणातून तिसऱ्या बायकोबरोबर घरात भांडण काढून तिला त्रास देवू लागला होता. ती ही त्याला त्या भांडणात जशास तसे उत्तर देत होती. तुझ्यात दम नाही म्हणून तु दोन बायकांना सोडचिठठ्ठी दिली आहेस असे म्हणत तिने युवराजच्या वर्मावर बोठ ठेवले होते. त्यावेळेपासून त्या दोघा नवरा बायकोची भांडणे वाढली होती. या भांडणात तो प्रणालीकडे ही दुस्वासाने बघत होती.ही कार्टीच नवरा बायकोच्या भांडणाची मुळ आहे असे त्याला वाटत होते. म्हणून बायकोबरोबर झालेल्या भांडणाचा राग तो प्रणालीवर काढत होता. अलिकडे तर तो प्रणालीला ही मारहाण करीत होता. बायको घरी नसताना तो तिला कोणत्या ना कोणत्या कारणातून मारहाण करीत होता. पप्पा मला सारखे मारतात म्हणून तिने आपल्या आईकडे तक्रार केली होती. ती घरी कामावरून आली की नवरा युवराजला तुम्ही प्रणालीला हात लावायचा नाही. काय भांडायचे आहे ते माझ्याबरोबर भांडा.मला मारहाण करा. पण माझ्या मुलीला मारू नकोसा असे तिने त्याला बजावले होते. परंतू प्रणालीविषयी युवराजच्या मनात नको नको ते विचार येत होते. हिच्यामुळे आपल्याला चार मित्रात खाली मान घालावी लागत आहे असे त्याला वाटत होते. प्रणालीलाच जर संपवून टाकले तर आपल्या नवरा बायकोत तिसरे कुणी ही येणार नाही असा विचार त्याच्या मनात येत होता. त्यातच कोल्हापूर जिल्हयातील मुरगुड जवळील सोनाळी येथील वरद पाटील या ७ वर्षीय मुलाचा अपहरण करून खून केल्याची घटना ताजी होती. त्या पध्दतीनेच आपण प्रणालीला संपवू या म्हणजे आपला मार्ग मोकळा होईल. म्हणून त्याने ता.१९ व २० ऑगस्ट रोजी प्रणाली गोड बोलून आपण बाहेर फिरायला जाऊ या म्हणत त्याने तिला हुपरी पंचतारांकीत एरियात नेले होते. त्या ठिकाणी दूधगंगा कालवा असल्याने त्या कालव्यात तिला ढकलून देण्याचा विचार त्याने केला. पण त्या ठिकाणी रात्र आणि दिवस लोकांची वर्दळ असल्याने त्याचे धाडस झाले नाही. धाडस जरी झाले नसले तरी त्याचा विचार मात्र बदलेला नव्हता. त्यानंतर तो २० ऑगस्टलाच आपण तुझ्या आजोळी इचलकरंजीला जावू या म्हणत परत प्रणालीला बरोबर घेतले आणि इचलकरंजीला आपल्या दुचाकी गाडीवर घेऊन प्रणालीला घेऊन निघाला. ९ वर्षाची प्रणाली तिला काय त्याच्या मनातील कळणार? ती ही पप्पा आजोळी इचलकरंजीला नेतात म्हणून त्याचेबरोबर गाडीवरून निघाली. त्यावेळी निघताना त्याने मुद्दामच वेळ केला. गाडीवर तो प्रणालीबरोबर गोड गोड बोलत येत असताना त्याने माणकापूरच्या पुढे आल्यावर रस्त्यावरील लोकांचा अंदाज घेतला. लोकांची वर्दळ चालूच होती. रात्री ९ ते ९.३०च्या दरम्यान तो तिला गाडीवर घेऊन इचलकरंजीतील माणकापूर हुपरी रस्त्यावरील पंचगंगा नदीच्या स्मशानभूमी कडील वाटेवर गाडी घातली. त्यावेळी तेथे कुणी नसल्याचे बघून त्याने नदीपात्राजवळ प्रणालीला बोलत बोलत नेले. पंचगंगेच्या वरच्या दोन्ही पूलावरून त्यावेळी तुरळक वाहतूक सुरू होती. कोणाचे लक्ष नसल्याचे बघून त्याने बेसावध असणाऱ्या प्रणालीला नदीत ढकूलन दिले. नदीला पाणी जास्त असल्याने ती पडल्या पडल्या गंटागळ्या खावू लागली. तिला पोहता येत नसल्याने ती पप्पा पप्पा म्हणून ओरडत होती. काही क्षणातच ती त्या पाण्यात बुडाली, तिचा आवाज बंद झाल्यावर युवराज हा तेथून निघाला. घरी आल्यावर त्याने बायकोला प्रणाली विषयी वेगळेच सांगितले. दुसऱ्या दिवसी त्याच्या बायकोने इचलकरंजीला आपल्या माहेरी फोन लावून प्रणाली विषयी विचारले पण इकडे प्रणाली व युवराज आले नसल्याचे त्यांनी तिला सांगितल्याने तिला युवराज विषयी शंका आली. ती त्याच्या बरोबर भांडू लागली. ती भांडण करू लागल्यावर त्याने वेगळाच डाव रचला. त्याने हुपरी पोलीस स्टेशन गाठून आपली मुलगी प्रणाली युवराज सांळुखे (वय ९) ही बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदविली. त्यामुळे त्याच्या बायकोचा राग थोडा फार शांत झाला. परंतु तरी ही तिच्या मनात युवराजने प्रणालीचे काही बरे बाईट केले नसेल का? असे विचार येत होती. दोन दिवस झाले तरी प्रणालीचा शोध लागत नव्हता. या दरम्यान बायकोच्या तगाद्याने युवराज हा सारखा हुपरी पोलीस स्टेशनला जावून प्रणाली बाबत विचारीत होता. तो याबाबत पोलीसांना वेगवेगळी माहिती सांगू लागल्याने पोलीस ही बुचकाळ्यात पडले होते. पोलीसाचा ही संशय युवराज वर होता. म्हणून पोलीसांनी त्याला ता.२३ ऑगस्ट रोजी त्याला संशयावरून त्याला हुपरी चौपाटीवरून ताब्यात घेऊन प्रणाली विषयी चौकशी चालू केली. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने प्रणाली हिला आपण इचलकरंजी जवळील पंचगंगा नदीत ढकूलन दिल्याची माहिती त्याने पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांना दिली.हा धक्कादायक प्रकार त्याने सांगितल्याने पोलीसांनी या घटनेची माहिती इचलकरंजी शिवाजी नगर पोलीसांना दिली. शिवाजी नगर पोलीसांनी तातडीने हालचाल करीत प्रणालीची शोध मोहिम एका पथकाबरोबर राबवित पंचगंगा नदीतील दुसऱ्या बाजुला असणाऱ्या शिरदवाड स्मशानभुमी जवळील एका झुडपात प्रणालीचा मृतदेह सापडला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यानी ही भेट देवून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसाना केल्या.घटनास्थळी प्रणालीचा मृतदेह सापडल्यावर प्रणालीच्या आईने व नातेवाईकांनी अक्रोश करीत नराधम युवराज सांळखे या सावत्र बापाला सोडू नका त्याला फाशी दया अशी मागणी केली. दरम्यान पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मयत प्रणाली हिचा मृतदेह शवच्छिेदनासाठी इचलकरंजीच्या आयजीएम रुग्णालयात पाठवून दिला. तेथे ही मयत प्रणालीचे शेवटचे तोंड पाहण्याच्या कारणावरून युवराज सांळुखे आणि प्रणालीचा पहिला बाप व इतर नातेवाईक याच्यात भांडणे होऊन एकमेकांच्या अंगावर धावून जात मारहाण करण्याचा प्रकार घडला. यात दोन्ही बाजुच्या महिलां जास्त आक्रमक होत्या. शवविच्छेदनानंतर प्रणालीचा मृतदेह तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आला. अंत्यंत शोकाकूल वातावरणात यळगुड येथे प्रणालीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी प्रणालीचा मृतदेह फुलांनी सजवलेल्या गाडीत ठेवला होता. गावातील लोकांनी आप अपाले व्यवहार बंद ठेवून या घटनेतील नराधम युवराज सांळखे याला फाशीची शिक्षा दयावी अशी मागणी केली. हुपरी पोलीस स्टेशनला अगोदरच प्रणालीची बेपत्ता अशी नोंद होती. हुपरी पोलीस स्टेशन येथे मयत प्रणाली हिच्या आईच्या तक्रारी वरून प्रणाली युवराज सांळुखे (९) हिचा नदीत ढकूलन देऊन खून केल्याप्रकरणी तिचा सावत्र बाप युवराज सांळुखे (४२) याच्या विरोधात गु.रजि.नं.२६६/२०२१ भा.दं.वी.कलम १६३, ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंद केला. हुपरी पोलीसांनी त्याला इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास हुपरी पोलीसाबरोबर शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. घरातील भांडणातून सावत्र बापानेच चिडून ९ वर्षीय प्रणालीला नदीत ढकलून देऊन तिचा खून केल्याने कुंटुंबातील ताणतणाव किती विकोपाला जातात आणि त्यातून कोणती अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## प्रेमविवाह केल्याने नशिबच फसले...

प्रेमात आकंठ बुडाली असल्याने तिने त्याच्याशी आता लग्न केले असल्याने शकीलच तिचा सर्वस्व होता.हे तिने मान्य करून मोन्याला परत आपल्या घराकडे येवू नकोस तसेच आपल्या पतीला दादागिरी करू नकोस असे बजावले होते. परंतू मोन्या हा काही गप्प बसणाऱ्यातील नव्हता.त्याला शकीलाला चांगलाच धडा शिकवयाचा होता.त्याच्यामुळे त्याला त्याच्या चार मित्रात मान खाली घालायला लागलेली होती.म्हणून तो परत परत शकील याच्या विकासनगर येथील घराकडे जावून त्याला आपल्या बहिणीस सोडून दे म्हणून भांडण काढत होता.त्यातच त्याने २८ डिसेंबर २०१९ रोजी शकीलवर तलवारीने वार करीत जीव घेणा हल्ला केला परंतू त्यावेळी सुदैवाने शकील हा त्याच्या हल्लयातून बचावला होता.त्यामुळे तो जास्तच शकीलवर चिडला होता.भांडणात तो त्याला तू माझा भावोजी नाहीस,मी तुझा मेहुणा नाही असे सांगून तुला आता कायमचेच गार करतो अशी धमकी त्याने दिलेली होती. मोन्या हा तापट आणि रागीट स्वभवाचा आहे.त्याला आपण केलेला प्रेमविवाह मान्य नाही हे त्याला व त्याची पत्नी खुशीला माहित होते.राग हा कधी ना कधी शांत होईल त्यावेळी त्याला समजावून सांगता येईल असे त्या दोघांनी ठरविले होते.परंतू मोन्या पुढे रागाच्या भरात कोणते टोकाचे पाऊल उचलेले असे त्याना स्वप्नात देखील वाटले नव्हते. आपल्या बहिणीला शकील याने फुस लावून पळवून नेले आहे त्याचा आपल्याला बदला घ्यावयाचा आहे हे मोन्याने आपल्या जवळच्या मित्रांना सांगितले होते.ते ही त्याला त्या कामासाठी मदत करण्यास तयार झाले. मोन्या आणि त्याच्या जवळच्या तिघां मित्रांनी शकील शेख याला मारण्यासाठी एक प्लॅन केला.तो सहजा सहजी ऐकणार नाही याची त्या दोघांना कल्पना होती.त्यामुळे ते दोघे ही त्याला मारण्यासाठी संधीच्या शोधात होते.तशी संधी मोन्या व त्याच्या तिघा मित्रांना सोमवार दि.१६ ऑगस्ट २०२१ रोजी मिळाली.रात्री ९ वाजणेच्या दरम्यान शकील हा आपला मित्र विकास रघुनाथ आवटे याची मोटार सायकल क्र.एम.एच. ११ एस ४४३४ वरून रणवरे वस्ती येथे कपडे आणण्यासाठी गेले.त्यावेळी ते दोघे कपडे घेऊन परत येत असताना जिंती गावाच्या हद्दीत जिंती पूल येथे आले असता मोन्या व त्याचे दोन मित्र दोन मोटार सायकलीवरून तेथे आले.त्यांनी शकील चालवित असलेल्या मोटार सायकलीच्या आपली मोटार सायकल आडवी मोटार सायकल घालून शकील याला व त्याचा मित्र विकास आवटे यांना खाली पाडले.त्या तिघांनी विकास याला धमकावून त्याला तेथून त्याची गाडी घेवून जाण्यास सांगितले. मोन्या व त्याचे दोघे मित्र त्यावेळी फुल्ल दारूच्या नशेत होता.त्यांनी शकील याला मारहाण करून आपल्या एका मोटार सायकलीवर जबरदस्तीने बसविले. त्याला घेवून ते तिघे ही मौजे होळ गावाच्या हद्दीतील आपटे यांच्या शेतात आणले. रात्रीच्या अंधारात त्यांनी त्याला जबर मारहाण करीत खाली पाडले.दोन दिवस पाऊस झाल्याने शेतात चिखल झाला होता.त्या चिखलात ते शकील याला लाथा बुक्कांनी तुडवून तुडवून मारीत होते.तो त्याना मला सोडून दया म्हणून गयावया करीत होता.पण मोन्याच्या डोक्यात शकील विषयी चीड असल्याने तो त्याला त्याच्या जातीवरून शिव्या देत माझ्या बहिणीला नादाला लावून पळवून नेतोस काय? मर साल्या म्हणत त्याला आपल्या जवळील तलवार काढून शकील याच्या अंगावर पायावर,तोडावर आणि डोक्यावर वार केले.त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.त्या ही अवस्थेत त्याच्या रागाचा पारा जास्तच चढल्याने त्यांनी त्याला त्या चिखलात पालथे घातले आणि वरती माती टाकून तेथून निघून गेले. भावोजीचा खून केल्यावर मोन्याचा रा थोडा शांत झाला होता. इकडे रात्री गेलेला शकील उशिरा पर्यत घरी परत न आल्याने त्याची पत्नी व घरच्या लोकांनी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केल्यावर विकास आवटे याने शकील याच्या पत्नीला म्हणजे खुशीला सांगितले की जिंती पूलावरून शकील याला मोन्या निभोरे आणि त्याच्या मित्रांनी त्याला मारहाण करून जबरदस्तीने त्याच्या गाडीवर बसवून नेले आहे.हे समजातच शकील याची पत्नी खुशी हिने फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन गाठून पती शकील अकबर शेख याचे अपहरण आपला भाऊ मोन्या निभोरे व त्याच्या मित्रांनी केल्याची तक्रार दाखल केली. युवकाच्या अपहरणाची तक्रार दाखल होताच फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस पो.निरी.नितीन सावंत यांनी तातडीने हालचाल करून बेपत्ता शकील शेख याचा शोध घेण्यास सुरूवात केली.त्यातच फलटण ग्रामीण पोलीसांना मौजे होळ गावच्या हद्दीत आपटे यांच्या शेतात एका युवकाचा मृतदेह पडला असल्याची माहिती मिळाली.फलटण ग्रामीण पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांना आपटे याच्या शेतात पालथ्या अवस्थेत चिखलात रूतून टाकलेला एका युवकाचा मृतदेह मिळून आला.त्याच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या.या घटनेची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे यांना मिळताच त्यांनी ही घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या.खुशी शेख हिने फलटण ग्रामीण पोलीसात पती शकील शेख याच्या अपहरणाची तक्रार दिली होती.त्या तक्रारीत वर्णन केलेप्रमाणे मयत तरूणाचे वर्णन होते.म्हणून पोलीसांनी खुशी हिला घटनास्थळी बोलावून घेवून मयताची ओळख पटविली होती.खुशी हिने मयत तरूण हा तिचा पती शकील अकबर शेख हा असल्याचे पोलीसांना सांगितल्यावर पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी फलटण येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. खुशी हिने दिलेल्या फिर्यादीत तिच्या पतीचे शकील शेख याचे अपहरण करून त्याला मारहाण ही तिचा भाऊ मोन्या निभोरे आणि त्याच्या मित्रांनी केल्याचे म्हटले होते.यावरून पोलीसांनी तपास चालविला होता.घटनास्थळावरून मोन्या व त्याचे साथीदार पळून गेले असल्याने पोलीसांनी त्याच्या शोधासाठी पोलीसांची दोन पथके तयार केली.एका पथकाला मोन्या व त्याच्या साथीदाराचा ठावठिकाणा लागला होता.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करीत पोलीसांनी घटनेनंतर काही तासातच मोन्या व त्याच्या साथीदारांना अटक करून ताब्यात घेतले. पोलीसांनी त्या तिघांना ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे शकील शेख याच्या खूनाविषयी चौकशी केली असता सुरूवातीला ते तिघे ही ना चा पाढा वाचीत होते. त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच ते तिघे पोपटासारखे बोलू लागले. त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. खुशी शेख (२२) हिने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी शकील अकबर शेख (२४) याचे अपहरण करून खून केल्या प्रकरणी मोन्या निभोरे व त्याच्या अन्य दोन साथीदारावर भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले. मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेल्या मोटार सायकली व तलवार जप्त केले.या घटनेचा पुढील तपास पो.निरी.नितीन सावंत याच्या मार्गदर्शनाखाली फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.बऱ्याच वेळेला राग आणि भीक माग अशी अवस्था काही जणांची होत असते.त्यातून ते बदल्याच्या भावनेने तडफडत असतात.कधी एकदा आपण समोरच्याला आपण संपवितो असे त्यांना होत असते. अशीच गत मोन्या निभोरे याची झाली होती. बहिणीने प्रेमविवाह केला म्हणून तो सुडाने पेटला आणि त्याने भावोजीला त्या कारणातून संपवून टाकले.म्हणूनच सुडाची भावना मनात न ठेवता रागावर नियंत्रण ठेवले पाहिजे होत.परंतु मुळातच गुन्हेगारी प्रवृतीच्या मोन्याला हे न रूचणारे असल्याने त्याने रागाच्या भरात भावोजीचा खून केला हे यातून दिसून येते.

## संशयाच्या भुताने पतीला केले बेजार...

पगार ही होता. त्या दोघांचा संसार सुखाने आणि निटनेटका चालू होता. गौरी ही त्याला संसारात पुर्णपणे साथ देत होती. पण अलिकडे गौरीच्या वागण्या बोलण्यात आणि राहणीमानात राहुल याला फरक जाणवत होता. ती तासन तास कुणाशी तरी आपल्या मोबाईल वरून बोलत होती. कामावरून राहुल घरी आला की त्याच्या बरोबर जास्त बोलत ही नव्हती. त्यामुळे राहुलला तिच्याबाबत संशय येत होता.तो तिच्याकडे त्याच नजरेने बघत होता. गौरी ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने देखणी बायको ही दुसऱ्याची असते असे त्याचे मत झाले होते.या कारणातून तो कामावरून घरी आला की तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत तिला तुझे बाहेर कुणाबरोबर संबंध आहेत.तु कुणाच्या नादाला लागली आहेस,तु कोणाला ठेवून घेतली आहेस म्हणून तिला मारहाण करीत तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता.ती त्याला भांडणात माझ्या वर तुम्ही नको तसले घाणेरडे आरोप करू नका.मी तसली बाई नाही हो म्हणून सांगत होती. पण राहुल याला तिच्या बोलण्यावर, सांगण्यावर अजिबात विश्वास नव्हता. उलट तो तिला तुझे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे आहे म्हणत होता. या कारणातून त्या दोघा नवरा बायकोची भांडणे विकोपाला गेली होती.पै-पाहुण्यानी ही त्याच्या भांडणात मध्यस्ती केली होती. पण त्या दोघांचे भांडण काही केल्या मिटत नव्हते. अलिकडे राहुल हा रात्रीपाळीला असला की घरी दारू पिऊनच येऊ लागला होता. दारूच्या नशेत तो गौरीवर नको तसले घाणेरडे आरोप करून शिव्या देत होता. तिला राहुल त्रास देत असल्याचे तिने आपल्या माहेरच्या लोकांना ही सांगितले होते. एकदा दोनदा गौरीच्या माहेरच्या लोकांनी राहुल याला ससारवाडीला बोलावून घेऊन त्याला गौरीला त्रास देवू नकोस, ती चुकीचे वागणार नाही,आणि ती तसली बाई ही नाही. तुम्ही उगीच तिच्यावर संशय घेऊन तिला मारहाण करू नका असे समजावून सांगितले होते.पण तरीही राहुलने आपल्या सासरवाडीच्या लोकांच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले. तो कामावर गेला की त्याच्या डोक्यात पत्नीच्या चारित्र्याचा संशय घोळत होता.ती आता कुणाबरोबर काय करीत असेल असले घाणेरडे विचार त्याच्या डोक्यात सतत येत होते. आपल्या पत्नीच्या चारित्र्याबद्दल त्याने आपल्या मित्रांना ही बोलून दाखविले होते. आपली पत्नी बाहेरख्याली वागत असून तिच्यापासून आपल्याला त्रास होत आहे. तिच्या बाहेरख्याली वागण्याने मी जास्त दारू पित आहे असे तो सांगत होता. नवरा बायकोचे दररोजचे होत असलले भांडण बघून त्याच्या घरमालकाने त्यांना घर खाली करण्यास सांगितले होते. घरमालकाने ही त्या दोघांना बऱ्याचवेळेला समजावून सांगितले होते. परंतू काही केले तरी राहूलच्या डोक्यातील तिच्याविषयी असणारा संशय कमी होत नव्हता. राहुल हा दररोज भांडण काढून मारहाण करीत असल्याने त्याच्या त्रासाला वैतागून गौरी ही जून महिन्यात आपल्या माहेरी निघून गेली होती. ती माहेरी निघून गेल्यावर राहुल जास्तच पिसाळला होता. तिचे माहेरतील कोणाबरोबर तरी लग्नाच्या अगोदरपासून संबंध असावेत म्हणून ती आपल्या माहेरात महिना महिना जावून राहत असते असे त्याला वाटत होते. जून महिन्यात त्या दोघांचे भांडण जास्तच पेटले होते. त्यामुळे गौरी ही रागावून संतापून माहेरी निघून गेली होती.आता काही झाले तरी राहुलबरोबर नांदायला परत यायचे नाही असे तिने ही ठरविले होते.लग्नाच्या दोन तीन वर्षातच त्याचा संसार मोडून पडायला लागला होता.राहुलचे घरचे आणि तिच्या घरचे लोक ही त्या दोघांना समाजवून सांगत त्याचा संसार पुन्हा उभा करीत होते. या प्रकरणात खरे तर गौरीचा काहीच दोष नव्हता. राहुल हा तिच्यावर संशय घेऊन साप साप म्हणून दोरीला बडवत होता. त्यातून खरे तर काहीच निष्पन्न होत नव्हते. या सगळ्या प्रकरणात राहुलचे कामावर ही लक्ष नव्हते. तो कामावर कमी आणि दारूत जास्त गुंतत चालला होता.तिच्या चारित्र्याच्या संशयाने तो बेजार झाला होता.त्यातच गौरी ही भांडून माहेरी गेली असल्याने तिला परत आणण्यासाठी तो काही केल्या जात नव्हता.तिचे बाहेर कुठे तरी लफडे आहे.त्यामुळे ती आपल्याबरोबर राहयला तयार नाही असे त्याला वाटत होते. गौरी तर त्याच्याकडे घटस्फोट मागू लागली होती. त्यामुळे भरला संसार मोडायला आला होता. अखेर त्या दोघांच्या भांडणात नातेवाईकांनी मध्यस्थी करीत समेट घडवून आणत दोघांना ही चार शहाणपणाच्या गोष्टी सांगून परत मार्गाला आणले होते.त्यामुळे राहुलने तिला जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडयात तिच्या माहेरहून परत आणले. परत आणल्यानंतर एक दोन आठवडे तो शांत होता. कामावर गेला की गौरीच्या चारित्र्याचा संशय परत त्याच्या डोक्यात घोळत होता. दारू पिऊन येऊन परत तो तिला मारहाण करू लागला होता. त्याचे मागचे तसे पुढे झाल्याचे बघून गौरीला आपण परत का या माणसाबरोबर राहयला आलो असे वाटत होते.तो तिला गुराला बडवतात तसे बडवत होता.ती त्याच्या हाता पाया पडून मला मारू नका मला सोडा हो म्हणत होती.पण त्याच्या डोक्यात आणि मनात तिच्या विषयी वेगळचे चालू असल्याने तो काही केल्या तिला सोडत नव्हता. त्या दोघांची भांडणे ही घराशेजारच्या रस्त्यावर ही चालत होती. त्यामुळे बघणाऱ्याला त्या दोघाचा तमाशा बरा वाटत होता.मंगळवार दि.१७ ऑगस्ट २०२१ रोजी रात्री ९.१५च्या दरम्यान त्या दोघा नवरा बायकोत भांडणे सुरू झाली. घरात तो तिला मारहाण करीत असताना ती आपला जीव वाचविण्यासाठी म्हणून घराशेजारच्या कच्चा रस्त्यावर पळत बाहेर आली होती. त्यावेळी रागाच्या भरात असणारा राहुल हा तिच्यामागे लोंखडी कोयता घेऊन लागला होता. त्याच्या डोक्यात एक प्रकराचे भूतच शिरले होते. गौरी ओरडत धावत पळत बाहेर रस्त्यावर आल्याने प्लॅटमधील लोक ही आपआपल्या गच्चीतून बाहेर का घडत आहे हे बघत होते. राहुलच्या घरमालकाने ही त्यावेळी आपल्या घरच्या बाहेरच्या गच्चीतून पाहिले असता, राहुल हा पत्नी गौरी हिला त्याचेकडील लोखंडी कोयत्याने वार करीत होता. रागाच्या भरात राहुलने गौरीच्या अंगावर कोयत्याने वार करून शेवटी तिला भोसकून टाकले. रात्रीच्या अंधारात समोरचे हे भायनक दृश्य बघून घरमालक ओरडत होते. पण राहुल काही तिच्यावर वार करायचे थांबत नव्हता. ती जीवाच्या आकांताने ओरडत होती. ती रक्ताच्या थारोळ्यात जमीनवर पडल्यावर तो शांत झाला होता. तिच्यावर वार होत असताना आजूबाजूचे काही लोक धावत पळत राहुल याला अडवायला आले. परंतू ते येण्या आधीच त्याने आपला डाव साधला होता. लोक आपल्याकडे धावत पळत येत असल्याचे बघुन राहुलने गौरीला संपवून घटनास्थळावरून कोयत्यासह पळ काढला होता. तो पळून गेल्यावर जमलेल्या लोकांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गौरीला उपचारासाठी तात्काळ रुग्णवाहिका बोलावून वायसीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले.परंतू तेथील उपचाराआधीच तिचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती हॉस्पिटलच्या प्रशासनाने लगेच हिंजवडी पोलीसात दिली. या घटनेची माहिती पोलीसांना मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची माहिती पोलीसांना मिळाली होती. घटनेनंतर राहुल प्रतापे हा पळून गेला असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. अखेर काही तासात तो पोलीसाना मिळून आल्यावर पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून घटनेची माहिती पोलीसांना दिली. घरमालकाच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या घटनेची फिर्याद दाखल करून घेऊन गौरी राहुल प्रतापे (वय २५) हिच्या खून प्रकरणी राहुल प्रतापे याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लोंखडी कोयता जप्त केला. या घटनेचा पुढील तपास हिंजवडी पोलीस करीत आहेत.पत्नीच्या चारित्र्याचा संशय पतीच्या मनात घर करून बसला की तो काही केल्या जात नाही, त्यातूनच मग खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## जेवणासाठी बोलवणाराच काळ ठरला...

वाशीमध्ये २ ऑगस्ट रोजी सत्तर वर्षीय महिलेचा मृतदेह नग्नावस्थेत सापडला होता. प्रत्येक खूनाच्या गुन्ह्यात पोलीसांना काहीतरी 'क्ल्यू' मिळतो. परंतू या गुन्ह्यात पोलीसांना कोणताही धागादोरा मिळाला नव्हता पोलिसांना हा गुन्हा गुंतागुतीचा वाटत होता. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आल्यावर त्या महिलेच्या दोन्ही हातावर विशिष्ठ असे डिझाईन गोंदलेले होते. त्यावरून घटनास्थळी मिळालेल्या वस्तू आणि आणि त्या महिलेचे कपडे एवढेच तपासाचे माध्यम पोलिसांसमोर होते. खुनाचा गुन्हा उघडीस आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांच्या नेतृत्वाखाली पथके तयार करण्यात आली. या महिलेच्या वयाचा अंदाज घेऊन त्याबाबत मिसिंगची तक्रार कोठे नोंदवण्यात आली आहे का? याबाबत पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली. मृतदेहाशी मिळत्या जुळत्या वर्णनाची मिसिंग प्रकरण गोवंडी पोलीस ठाण्यात नोंद असल्याचे दिसून आले. याप्रकरणी मिसिंगची तक्रार देणाऱ्या तरूणाला वाशी पोलीस ठाण्यात बोलवण्यात आले. मृतदेहाजवळ मिळालेले कपडे-साडी-ब्लाऊज आणि चप्पल त्याला दाखवण्यात आले. त्यावेळी त्यांनी ओळखून गोंदण्याच्या डिझाईनवरुन हा मृतदेह त्यांच्या आईचा असल्याचे त्या तरूणाने पोलीसांना सांगितले. यावरून त्या मृतदेहाची ओळख पोलिसांना आता पटली होती. परंतू हा महिलेची हत्या कुणी? व का केली? हे दोन प्रश्न पोलीसांपुढे आ करून उभे होतेच. याचा उलघडा होणे बाकी होते. या वृद्ध महिलेचा मारेकरी कोण.? पोलीसांनी तिच्या मुलाची ही प्राथमिक चौकशी केली. परंतू त्यातूनही काही उपयुक्त माहिती पोलीसांना मिळाली नाही. हा गुन्हा तसा थोडा गुंतागुंतीचा वाटत होता. ७० वर्षीय वृद्ध महिलेचा दुश्मन कोण असणार.? शिवाय तिला ठार मारून कुणाला फायदा होणार आहे.? शिवाय या महिलेकडे काही किंमती वस्तू अगर पैसे ही नव्हते ते चोरीच्या उद्देश्याने हत्या झाली असावी असे ठरवून तपास करता येईल. परंतू तसं ही काही नव्हते. मग हिची हत्या का झाली? तपास पोलीसांना बुचकळ्यात पडणारा होता. पोलिसांनी मग या तपासासाठी जवळपास १५० ते २०० सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. यानंतर या गुन्ह्याची खरी माहिती समोर आली. खऱ्या गुन्हेगाराचा चेहरा या सीसीटीव्हमध्ये कैद झाला होता. २९ जुलै रोजी सायंकाळी या महिलेचा इनॉर्बिट मॉलच्या सिग्नलच्या आसपास वावरताना दिसली. परंतु रात्री ९.५० वाजताच्या सुमारास तिच्यासोबत एक पुरुष सोबत असल्याचे या फुटेजमध्ये आढळून आले. पोलिसांनी त्या आरोपीची चौकशी करत त्याचा अधिक तपास सुरु केला. २१ ऑगस्ट रोजी तो दुपारी हावरे फॅंटासियाजवळ पुलाखाली आल्याची माहिती मिळताच त्यावरून पाळतीवर असलेल्या पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करत अत्यंत हुशारीने आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी लातूरचा असून त्याचे नाव कानीफनाथ दिलीप कांबळे वय २६ असे आहे. सध्या काम नसल्याने वाशी आणि सानपाडा पुलाखाली राहत होता. त्याचा सीसीटीव्ही फुटेज वरून त्यास अटक करून वाशी कोर्टात हजर काण्यात आले. ७० वर्षीय महिलेला एका तरुणाने जेवणासाठी बोलावून तिच्यावर अतिप्राणग (अत्याचार) केला असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. या महिलेने विरोध करताच या दोघांमध्ये झटापट झाली. तेव्हा बाजूला असलेल्या काचेच्या वस्तूने त्या तरूणाने तिचा गळा चिरून हत्या करण्यात केली होती. वाशी पोलिसांनी ताबडतोब या आरोपीच्या शोध घेऊन त्याला बेड्या ठोकल्या. हा तरुण २६ वर्षीय आहे. वाशी रेल्वे स्टेशन नजीक पामबीच मार्गावरील पुलाखाली २ ऑगस्ट रोजी या महिलेचा मृतदेह नग्न अवस्थेत सापडला. तिचा मृतदेह गोणीत अर्धवट भरण्यात आला होता. पोलिसांनी या घटनेचा जोमाने तपास करण्यास सुरुवात केली. मुंबईचे १२ कक्ष तर ठाण्याचे ५ आणि नवी मुंबईचे २० पोलीस ठाण्यातील यंत्रणा यासाठी तपास करत होती. मृतदेहाची कुजलेल्या अवस्थेत असल्याने त्याची ओळख देखील पटत नव्हती. जोपर्यंत ओळख पटत नाही तोपर्यंत हत्येच्या गुन्ह्याची उकल होणे कठीण असते. म्हणून पोलीस मृतदेहाची ओळख पटवण्यात गुंतले होते. पोलिसांनी मग या तपासासाठी जवळपास १५० ते २०० सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली. यानंतर या गुन्ह्याची खरी माहिती समोर आली. खऱ्या गुन्हेगाराचा चेहरा या सीसीटीव्ही मध्ये कैद झाला होता. २९ जुलै रोजी सायंकाळी या महिलेचा इनॉर्बिट मॉलच्या सिग्नलच्या आसपास वावरताना दिसली. परंतु रात्री ९.५० वाजताच्या सुमारास तिच्यासोबत एक पुरुष सोबत असल्याचे या फुटेजमध्ये आढळून आले. पोलिसांनी त्या आरोपीची चौकशी करत त्याचा अधिक तपस सुरु केला. २१ ऑगस्ट रोजी तो दुपारी हावरे फॅंटासियाजवळ पुलाखाली आल्याची माहिती मिळताच त्यावरून पाळतीवर असलेल्या पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करत अत्यंत हुशारीने आरोपीला ताब्यात घेतले. आरोपी लातूरचा असून त्याचे नाव कानीफनाथ दिलीप कांबळे ,वय २६ असे आहे. सध्या काम नसल्याने वाशी आणि सानपाडा पुलाखाली राहत होता. त्याचा सीसीटीव्ही फुटेज वरून त्यास अटक करून वाशी कोर्टात हजर काण्यात आले. कोर्टाने २७ ऑगस्टपर्यत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या हत्येचे गूढ आता उकलले आहे. या ७० वर्षीय महिलेला एका तरुणाने जेवणासाठी बोलावून तिच्यावर अतिप्राणग (अत्याचार) केला असल्याची माहिती आता समोर आली आहे. या महिलेने विरोध करताच आपण पकडले जाऊ म्हणून बाजूला असलेल्या काचेच्या वस्तूने तिचा गळा चिरून तिची हत्या करण्यात आली. वाशी पोलिसांनी या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. खुनाचा गुन्हा उघडीस आणण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांच्या नेतृत्वाखाली पथके तयार करण्यात आली. या महिलेच्या वयाचा अंदाज घेऊन त्याबाबत मिसिंगची तक्रार कोठे नोंदवण्यात आली आहे का? याबाबत पोलिसांनी माहिती घेण्यास सुरुवात केली. मृतदेहाशी मिळत्या जुळत्या वर्णनाची मिसिंग प्रकरण गोवंडी पोलीस ठाण्यात नोंद असल्याचे दिसून आले. मृतदेहाजवळ मिळालेले कपडे - साडी-ब्लाऊज आणि चप्पल दाखवण्यात आले. त्यावेळी त्यांनी ओळखून गोंदण्याच्या डिझाईनवरुन हा मृतदेह त्यांच्या आईचा असल्याचे सांगितले. यावरून त्या मृतदेहाची ओळख पोलिसांना मिळाली होती.

# सेवालाल नगर व बक्षी हिप्परगा येथे अवैध देशी दारूच्या हातभट्टया उद्ध्वस्त

## सोलापूर तालुका आणि पोलीस ठाण्याची कामगिरी





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील सोलापूर तालुका, पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे सेवालाल नगर व बक्षी हिप्परगा या परिसरात चोरून चालणाऱ्या अवैध हतभट्टी दारूच्या भट्टया उदध्वस्त करण्याच्या अनुषंगाने, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुर्यकांत पाटील पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय) सोलापूर ग्रामीण अतिरिक्त कार्यभार उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर याचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दिनांक ३० ऑगस्ट व ३१ ऑगस्ट रोजी विशेष मोहिम राबवुन पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह अवैधरित्या चालणाऱ्या दारूच्या हातभट्टया वर छापे टाकुन कारवाई करण्यात आली आहे.

अवैधरित्या चालणाऱ्या देशी दारूच्या हातभट्टयावर टाकलेल्या छापा कारवाईत एकूण ८ लाख ४० हजार रूपये किंमतीचे त्या मध्ये ४० हजार लिटर गुळमिश्रीत रसायन, १९० प्लॅस्टीक बॅरेल व ११ लोखंडी बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य, अवैध दारूच्या हातभट्टया जागेवरच उध्दवस्त प्लॅस्टीक व लोखंडी बॅरेल जागीच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे. सेवालाल नगर व बक्षीहिप्परगा या ठिकाणी अवैध दारूच्या हातभट्टया उध्दवस्त केलेल्या ठिकाणी एकूण १० इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर दाखल करण्यात आलेल्या गुन्हयाच्या तपास सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार याचेकडुन होत आहे. यापुर्वी देखील सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात चोरून चालणाऱ्या अवैध देशी गावंठी दारूच्या हातभट्टया उदध्वस्त करून कारवाई करण्यात आलेली आहे. यापुढेही अशा व इतर प्रकारच्या चोरून अवैध व्यवसाय करणाऱ्या इसमा बाबत गोपनियरित्या माहिती प्राप्त करून त्यांचे विरूध्द कारवाई करण्यात येणार असल्याचे सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी सांगितले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुत, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुर्यकांत पाटील, पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय) सोलापूर ग्रामीण अतिरिक्त कार्यभार उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर याचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांचे नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर, प्रविण सपांगे, पोलीस उपनिरीक्षक दिपक दळवी व पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अंमलदार/महिला अंमलदार यांनी बजावली आहे.

# शिवशक्ती कॉलनीत अर्धवट कामे करून काढले पुर्ण बिल!

## माजी सैनिकाच्या घरासमोरील गटारीचे काम दिले सोडून

**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव शहरातील निमखेडी शिवारातील खोटेनगर भागातील शिवशक्ती कॉलनीमध्ये सार्वजनिक गटार बांधकामामध्ये मोठ्या गैरव्यवहार झाल्याची चर्चा असून ठेकेदाराने अधिकाऱ्यांशी संगनमत करून माजी सैनिकाच्या घरासमोरील गटारीचे काम न करता बिले काढल्याचीही चर्चा जोर धरू लागली आहे. जळगाव मनपा हद्दीमधील मौजे निमेखेडी शिवारातील खोटेनगर भागातील शिवशक्ती कॉलनी मधील गट नं.१०१, प्लॉट नं.३८ येथील रहिवाशी असलेले माजी सैनिक योगराज रामदास पाटील यांच्या घरासमोरील हा प्रकार असल्याचे कळते. योगराज पाटील हे गेल्या अकरा वर्षापासून याठिकाणी राहतात. त्यांच्या घरासमोरील उत्तरेकडील गल्लीमध्ये सार्वजनिक गटारीचे बांधकाम सुरू होते मात्र काही कारणास्तव ते बंद पडले यानंतर चौकशी केली असता ते पुर्ण झाल्याचे रहिवाश्यांना समजले. दरम्यान योगराज पाटील यांच्यासह काही रहिवाश्यांच्या घरासमोरील गटारीचे बांधकाम अपुर्ण असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. यासंबंधी लोकप्रतिनिधींकडे तक्रार केली असता ते ठेकेदारांना आणि संबंधित अधिकाऱ्यांना पाठिशी घालत असल्याचेही बोलले जात आहे. दरम्यान मनपाचे संबंधित शाखा अभियंता यांना नागरिकांनी जाब विचारला असता, आमच्याकडे तक्रारी नसल्याने आम्ही काहीही करू शकत नाही असे त्यांना मौखिक उत्तर मिळत आहे. यामुळे नागरिकांमध्ये असंतोष



वाढत आहे. मनपा प्रशासनाने संबंधीत गटारीच्या बांधकामाविषयी सर्वव्यापी चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी या मागणीसाठी शिवशक्ती कॉलनीमधील रहिवाशी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.

# नांदेडात ऑनलाईन लॉटरी जोमात

**नांदेड /प्रतिनिधी**

नांदेड शहरातील बसस्थानक परिसरात अवैध धंद्या पाठोपाठ ऑनलाइन लॉटरीचा सुळसुळाट प्रचंड प्रमाणात वाढला आहे. यावर सध्या तरी कोणाचेही नियंत्रण राहिले नाही. याचा फटका हा सर्वाधिक शासनाला तर होतोच आहे. मात्र हातावर पोट भरणार्यालना मात्र आपल्या संसाराला दारिद्र्य ढकलण्याची वेळ आली आहे. ऑनलाइन लॉटरी सकाळी नऊ ते रात्री नऊ वाजेपर्यंत चालते दर दोन मिनिटाला सोडत होते. एका तासात ३० वेळा आणि दिवसभरात ३६० वेळा ही सोडत काढली जाते. यामध्ये लॉटरी काढणाऱ्याच्या हाती मात्र भोपळाच येतो. सुशिक्षित बेरोजगार, विद्यार्थी, कामगार, मजूर, कर्मचारी व्यापारी यासह अनेक जण झटपट पैसा मिळवण्याच्या आणि श्रीमंत होण्याच्या आमिषाला बळी पडतात. दिवसभर आउट होतात विजय मात्र मिळत नाही. शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मटका, पत्त्याचे क्लब, ऑनलाइन लॉटरी, अवैध दारू विक्री हे चालू असताना परत यात ऑनलाइन लॉटरी ची भर पडली आहे. सध्या ऑनलाईन चा जमाना असल्यामुळे झटपट निकाल हाती येणे अत्यंत महत्त्वाचं वाटतं. यात विविध नाव धारण करून या लॉटरी चालतात. रॉयल स्टार, बादशहा, बादशाह स्टार, थंडा टारगेट, टायगर स्टार या नावाने या लॉटरी उपलब्ध आहेत. दिवसभर कमवलेला पैसा सायंकाळी घरी जाताना मजूर आणि कामगार यात पाडले जातात. या लॉटरी मुळे शासनाकडे कर किती भरला जातो हा संशोधनाचा विषय आहे. पण या लॉटरी मात्र राजरोसपणे चालू आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही. या लॉटरी बंद होणं अत्यंत महत्त्वाचा आहे.

## थोडक्यात वृत्तांत



### धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळला

उल्हासनगर : उल्हासनगर कॅम्प ४ येथील सुभाष टेकडी येथील गुरुद्वारा परिसरातील व्यकटेश सदन नावाच्या इमारतीच्या समोरील स्लॅब कोसळल्याची घटना घडली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाहीय. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान उल्हानगरमध्ये सातत्याने अशाप्रकारच्या इमारत दुर्घटना होत असल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यात जुन्या इमारतींमध्ये तर रहिवाशी जीव धोक्यात घालूनच वास्तव्य करत आहेत. गंभीर बाब म्हणजे स्लॅब कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असतांना धोकादायक इमारतीचा मुद्दा ऐरणीवर आलाय.

### चाकुहल्ल्या प्रकरणी देवणी नगरपंचायतीतर्फे निषेध

देवणी : ठाणे महापालीका माजीवाडा-मानपाडा प्रभाग समीतीच्या साहयक आयुक्त कल्पीता पींपळे यांच्यावर सोमवारी सायंकाळी कासारवडवली या परिसरात फेरीवाल्याने चाकुहल्ला केल्याने या हल्यात त्यांच्या हाताची दोन बोटे कापली गेली आहे त्या निषेधार्थ नगर पंचायत कार्यालय देवणी येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केले व एक दिवसाचे लेखणी बंद अंदोलन केले. यावेळी प्रशासकीय अधिकारी श्रीपाद कुलकर्णी, सुमित देबडवार, आमोल बाजुळगे, गोविंद ताठे, प्रभाकर ताराळकर, बापुराव बोडरे, संतोष जिवणे, यादव लोकरे, नाजीम मोमीन, अमोल शिंदे, रविंद्र कांबळे, प्रताप पाटील, देवीदास सुर्यवशी, नामदेव टाळकोटे, राजकुमार पतंगे कर्मचारी उपस्थित होत.

### सुनील गजभारे यांना पितृशोक

लातूर : लातूर जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी सुनील गजभारे यांचे वडील श्रीरंग किसनराव गजभारे(वय ७३ वर्षे) यांचे २० ऑगस्ट २०२१ रोजी दुपारी १ वाजता लातूरच्या एका खाजगी रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त होत आहे. पोटाच्या विकारामुळे त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. श्रीरंग गजभारे यांच्या पार्थीवावर खाडगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्मृतीशेष श्रीरंग गजभारे यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, चार सुना, बहिण, नातवंडे असा परिवार आहे.

### देवणीत नारायण राणे यांच्या पुतळ्याचे दहन

देवणी : देवणी येथील बोरोळ चौकात शिवसेना युवासेना यांच्या वतीने कोंबडीचोर नारायण राणे यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या विरोधात प्रसार माध्यमांसमोर अपशब्द बोलल्यामुळे त्याच्या विरोधात तक्रार दाखल व त्याच्या पुतळ्याचे दहन करुन तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी उपस्थीत शिवसेना तालुकाप्रमुख पंडीत भंडारे, युवासेना तालुकाप्रमुख संताजी पाटील भोपणीकर,बालाजी बिरादार संगांयो सदस्य, रणजीत दोडके उपतालुकाप्रमुख, दिपक मळभगे, लक्ष्मण बिरादार, पंढरी जवळदापके, अमोल भोसले, विवेक महानुरे, ञषी देवणे, अजय तुळजापुरे, कृष्णा पिंजरे, लक्ष्मण रणदिवे आदी शिवसैनिक युवासैनिक उपस्थीत होते.

# सांगोला येथे गुटख्यासह ११ लाखांचा मुद्देमाल जप्त




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील कडलास रस्त्यावरील महाविद्यालयाजवळ एका अशोक लेलेन्ड कंपनीच्या पिकअप मधून वाहतूक करण्यात येत असलेला साडे अकरा लाखांचा गुटखा सांगोला पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी उमेश सुभाष भुसे (अन्नसुरक्षा अधिकारी, सोलापूर) यांनी वाहन चालक शेरू नवाब पठाण (रा.अब्रार कॉलनी औरंगाबाद) तसेच महंमद आसिफ जब्बार काच्चीया (रा.सदाफ कॉलनी औरंगाबाद) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सांगोला पोलिसांना गुटखा व सुगंधी तंबाखूची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सांगोला ते जत रस्त्यावर नाकाबंदी केली. कडलास रोडवरील महाविद्यालयाजवळ एक अशोक लेलेन्ड कंपनीचा पिकअप वाहन भरधाव वेगाने जाताना दिसून आले. त्याचा संशय आल्याने त्यास थांबवून तपासणी केली असता त्यात गुटखा व सुगंधी तंबाखू आढळून आला. यावेळी पोलिसांनी सुमारे ४ लाख २९ हजार रुपये किंमतीचा ३० पोती हिरा मसाला, २ लाख ३१ हजारांचा रॉयल ७१७, सुगंधी तंबाखूची १५ पोती आणि ५ लाखांचे वाहन असा एकूण ११ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप व त्यांच्या टीमने केली आहे.

# वाहनावर अशोकस्तंभ सोबत आमदारांचे कोरे लेटरहेड

## पोलिसांच्या ताब्यात राहुल आहेरची झाली ओळख परेड

**नाशिक/प्रतिनिधी**

चारचाकी वाहनावर पुढे व मागे अशोक स्तंभासह विधानसभेचे स्टीकर लावून आपण लोकसेवक असल्याचा भास निर्माण करणाऱ्या तसेच आमदारांच्या सहीचे कोरे लेटरहेड बाळगणाऱ्यास नाशिक ग्रामीण पोलिसांच्या पथकाने अटक केली आहे. नाशिक ग्रामीण पोलिस अधिक्षक सचिन पाटील यांना मिळालेल्या माहीतीप्रमाणे सदर कारवाई २९ ऑगस्टच्या मध्यरात्री एक वाजता करण्यात आली. वणी पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या शिंदवड गावाच्या त्रिफुलीवर करण्यात आलेल्या कारवाईत राहुल दिलीपराव आहेर (३२) रा. शिंदाड ता. दिंडोरी जि. नाशिक यास अटक करण्यात आली आहे. राहुल आहेर या तरुणाच्या ताब्यात मिळालेल्या सिल्व्हर रंगाच्या इनोव्हा गाडीच्या (एमएच १५ डीएम ४१७५) पुढील व मागील बाजूस असलेल्या काचेवर गोलाकार हिरव्या व सिल्व्हर रंगाचे सत्यमेव जयते लिहिलेल्या व अशोकस्तंभाच्या चित्राचे स्टीकर लावलेले आढळून आले. याशिवाय केवळ अधिवेशन कालावधीसाठी वाहन प्रवेश पास नावाच्या लोगोचे देखील स्टीकर आढळून आले.

सदर वाहन शासकीय असल्याचे भासवण्याचा प्रयत्न असल्याचे एकंदरीत तपासणीत आढळून आले. तसेच नरहरी झिरवाळ, विधानसभा सदस्य यांच्या नावाचे राजमुद्रा असलेले सही असलेले कोरे नोटपॅड



देखील त्याच्या कब्जात आढळून आले. याशिवाय माजी आमदार अनिल कदम यांचे विधानसभा सदस्यांचे ओळखपत्र, त्यांचा फोटो असलेले व स्वताचे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय प्रवेश पत्रिका पोलिस पथकाला आढळून आले.

या सर्व कागदपत्रांचा व वाहनाचा गैरवापर करुन विधानभवनात आमदार शिक्षणमंत्री व इतर मंत्र्यांसोबत आपले जवळचे संबंध असल्याचे भासवण्याचा राहुल आहेर याचा प्रयत्न असल्याचे दिसून आले. लोकांच्या शाळा अनुदानीत करुन देण्याच्या भुलथापा देत त्यांच्याकडून दिड लाख रुपये घेत खोटे कागदपत्र मिळून आल्यामुळे राहुल आहेर याच्याविरुद्ध वणी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वणी पोलीस स्टेशनला सदर गुन्हा भा.द.वि. १७१, १७१ अ, ४२०, ४६८, ४६९ सह राजमुद्रा प्रति कायदा कलम ७ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. राहुल आहेर यास अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला ३ सप्टेबर पर्यत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. नाशिक ग्रामीण पोलिस अधिक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वणी पोलिस स्टेशनचे स.पो.नि. स्वप्निल राजपुत यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि. गुरळे, सहायक फौजदार पाटील, हवालदार वराडे, सानप, पोलिस नाईक जगताप, खराटे, मासुळे, पो.कॉ. बहिरम यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# शेती व शेतीशी निगडीत प्रशिक्षण या योजनेसाठी आदिम जमातीच्या लाभार्थ्यांनी अर्ज सादर करावीत!

**पालघर/प्रतिनिधी**

आदिम जमातीचे संरक्षण व विकास कार्यक्रम अंतर्गत प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार जि. पालघर अंतर्गत जव्हार, मोखाडा, विक्रमगड व वाडा या चार तालुक्यातील आदिम जमातीच्या (कातकरी) लाभार्थ्यासाठी Training Programme For Agri & Animal Husbandary For PVTG'S (शेती व शेतीशी निगडीत पशुपालन प्रशिक्षण) योजनेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेव्दारे आदिम जमातीच्या शेतकऱ्यांना कृषी, पशुपालन देणे याबाबत मुलभुत प्रशिक्षण देणे, त्यांना कृषी व पुशुपालन या बाबत अद्यायावत तंत्रज्ञान शिकविणे व त्याबाबत त्यांची क्षमता बांधणी करुन त्यांचे उत्पादन वाढविणे यासाठी शेतकऱ्यांना १ एकात्मिक किड नियंत्रण, २. शेंद्रीय शेती व पध्दती, ३. मृदा संवर्धन, ४.शेळीपालन कुक्कुटपालन व व्यवस्थापन ५ दुग्धव्यवसाय व्यवस्थापन,६ कृषी माल प्रकीया व विपणन,७. जल व्यवस्थापन इत्यादी बाबींचे प्रशिक्षण मोफत देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी खालील कागदपत्रांसह या कार्यालयात दि.२ ते ९ सप्टेंबर २०२१ या कालावधीत विहीत नमुन्यात अर्ज सादर करावीत.

**अटी व शर्ती तसेच कागदपत्रांबाबत तपशिल**

लाभार्थी हा आदिम जमातीचाच असावा, जातीचा दाखला जोडण्यात यावा. लाभार्थ्यांकडे शेतजमीन असावी त्यासाठी सातबारा किंवा वनपट्टा धारक असल्याचा दाखला जोडण्यात यावा. लाभार्थ्यांकडे रहीवाशी दाखला असावा. ग्रामसभेचा ठराव असावा. लाभार्थ्यांचे आधारकार्ड व रेशनकार्ड च्या छायांकीत प्रती अर्जासोबत सादर कराव्या. अर्जासोबत अलीकडे काढलेले २ पासपोर्ट आकाराचे फोटो जोडण्यात यावे. विधवा, परितक्त्या दिव्यांग कातकरी लाभार्थ्यांना योजन मंजूर करण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.

अंतिम लाभार्थी निवडीबाबतचे सर्व अधिकार प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, जव्हार यांनी सर्व अधिकार राखुन ठेवण्यात आले आहेत. विहीत नमुन्याचे लाभार्थी अर्ज कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. असे आवाहन एका प्रसिध्दी पत्राव्दारे आयुषी सिंह, प्रकलप अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार जि.पालघर यांनी केले आहे.

# भिवंडीत गौरीपाडा व अंबिका नगरात सुरु झाले श्रावणी तीन पत्ती काठी लाठी जुगार

## राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा सक्रिय सहभाग, पोलीस निंद्रावस्थेत!

**भिवंडी/प्रतिनिधी**

दहा दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी भिवंडी शहरातील काही महत्त्वाच्या ठिकाणी तीन पत्ती श्रावणी क्लब लाठी क्लब काठी आणि पत्ते क्लब भोईवाडा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत गौरीपाडा याठिकाणी भाजपा शहर महासचिव रवि सावंत व भिवंडीतील जुगार माफिया दिलीप शांतीलाल जैन यांच्या संयुक्त भागीदारीतून खुलेआम तीन पत्ती जुगार सुरू झाला आहे. खासकरून मुंबई, उल्हासनगर,ठाणे आणि गुजरात वरूनही खास महिला खेळाडू यात सहभाग घेत आहे. भोईवाडा पोलिसांचे यात अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे.रात्रीच्या अंधारात भोईवाडा पोलिस स्टेशनच्या बीट मार्शल आणि डीबीचे लोक या जुगार अड्डाच्या बाजूला घरट्या घालताना आमच्या प्रतिनिधींना दिसून आले आहे. मात्र कारवाई शून्य आहे. आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार खास पोलिसांसाठी मद्याची पॅक हे ठिकाणी भरलेले असतात. तशीच अवस्था निजामपूर पोलीस स्टेशनच्या अंबिकानगर येथे आहे या ठिकाणी शिवसेना उपशहरप्रमुख राम शिगवण. कपिल सोनी यांनी जुगाराच्या क्लब बरोबरच असलियतचा बाजार मांडला आहे. उच्चभ्रु आणि चांगल्या व्यापारी लोकांची वस्ती असलेला अंबिकानगर मध्ये रात्रीच्या अंधारात अगदी तोडक्या कपड्यात जुगार खेळण्यासाठी येणाऱ्या महिला नेमक्या कोण आहे आणि कुठून येतात याचा शोध निजामपुरा पोलिसांनी घ्यायला हवा. गणेशोत्सवात सुरू होणाऱ्या या जुगाराच्या आड्यामुळे अनेक वेळा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे दोन राजकीय गटात वाद झाले आहे याची सर्व कल्पना भोईवाडा आणि निजामपुरा पोलिसांना असतानासुद्धा फक्त आर्थिक हव्यासापोटी व पैशाच्या भुकेसाठी खुले आम परमिशन या जुगार माफियांना देत असल्याचा आरोप सुज्ञ नागरिक करीत आहे. त्यामुळे या गंभीर बाबीकडे ठाणे पोलीस आयुक्त केव्हा लक्ष देऊन कडक कारवाई करणार असा प्रश्न सुद्धा सुज्ञ नागरिक करीत आहे.

# आज बोटे तोडली उद्या गळे चिरतील!

महाराष्ट्रात परप्रांतीयांच्या विरोधात राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका का घेतली होती ते सोमवारी ठाण्यात घडलेल्या भयंकर घटनेनंतर सर्वानाच कळले असेल. खास करून परप्रांतीयांची तळी उचलणाऱ्या काँग्रेस राष्ट्रवादी आणि भाजपा या तीन पक्षांना आता तरी अक्कल येईल आणि परप्रांतीय किती खतरनाक असू शकतात ते कळू शकेल. परप्रांतातून पोट भरण्यासाठी मुंबईत येणाऱ्या लोकांना कुणाची मनाई नाही, पण इथे येऊन इथले खाऊन इथल्याच लोकांवर टांग वर करून मुतण्यास मनाई आहे. ठाण्यासारख्या गर्दीच्या शहरात परप्रांतीय फेरीवाले रस्ते अडवून बसतात. लोकांना चालायला फुटपाथ ठेवत नाहीत, मग अशा लोकांवर पालिकेने किंवा पोलिसांनी कारवाई करायची नाही का? अरे इथे पोट भरायला आलात ना! मग नियम कायदे पाळून पोट भरा! ज्यांच्यामुळे तुमची रोजी-रोटी सुरू आहे त्यांच्यावरच हत्यारे चालवतायत आणि ही मुजोरी इथल्या मराठी माणसांनी सहन करायची? कशासाठी? एक महिला पालिका अधिकारी बेकायदेशीरपणे रस्ता अडवून धंदा करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करायला जाते आणि तो तिच्यावर कोयत्याने हल्ला करून तिची बोटे तोडतो हा प्रकार किती भयानक आहे. एवढी मुजोरी त्या परप्रांतीय फेरीवाल्यांकडून आली कुठून? काल परवापर्यंत हे परप्रांतीय फेरीवाले ग्राहकांशी उद्धटपणे वागत होते, पण त्याच वेळी जर त्यांना फटके दिले असते तर एका पालिका अधिकारी महिलेवर हत्यार चालवण्याची त्याची हिंमतच झाली नसती. अरे आज त्यांनी एका महिलेची बोटे तोडलित उद्या तुमची डोकी मारायला मागेपुढे पाहणार नाहीत. जे राजकीय पक्ष आज मतांच्या लाचारीसाठी परप्रांतीयांचे लांगूलचालन करीत आहेत ते परप्रांतीय आज ना उद्या या राजकीय नेत्यांच्या लांगोट्याही जाग्यावर ठेवणार नाहीत. त्यामुळे तुम्ही कोणाला अभय देताय आणि त्याचे भविष्यात काय परिणाम होणार आहेत याचा थोडा तरी विचार करा. परप्रांतीय हे सुद्धा भारतीयच आहेत आणि देशाच्या घटनेनुसार त्यांना देशातील कुठल्याही राज्यात किंवा त्या राज्यातील शहरांमध्ये जाऊन पोट भरण्याचा अधिकार आहे आणि यामुळेच महाराष्ट्राने परप्रांतियांना आपले बांधव समजून त्यांना इथे पोट भरण्याची त्यांच्यातील कला गुणांचा विकास करण्याची संधी दिली आणि याच संधीचा जोरावर ते मोठे झाले. आज बॉलिवूड असो, उद्योगजगतात असो की राजकीय क्षेत्र असो प्रत्येक क्षेत्रात परप्रांतातून आलेल्या लोकांनी त्यांना मिळालेल्या संधीचे सोने करून स्वतःला घडवले. कित्येक लोक येताना फक्त लोटा घेऊन आले आणि जाताना बीएम. डब्ल्यू सारख्या महागड्या कार मधून जात आहेत. येवढं सगळ महाराष्ट्राने परप्रांतीय लोकांसाठी केले आहे. पण त्यांना यांची जाणीव आहे का? आणि जाणीव असती तर त्यांच्यापैकीच एका परप्रांतीय फेरीवाल्यांनी एका महिला अधिकारीची बोटे तोडली नसती. आज परप्रांतीय येथे पोट भरायच्या नावाने येतात कुठेही मोकळ्या जागेत चार बांबू ठोकून सुरवातीला तात्पुरता आणि नंतर पालिका अधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन पक्के पण बेकायदेशीर घर बनवतात. ज्या भागात राहतात त्या भागात दादागिरी करून वचक निर्माण करतात आणि नंतर काँग्रेस-राष्ट्रवादी किंवा भाजप सारखा पक्ष जॉईन करून तिथले पुढारी बनतात हे सर्व करीत असताना आपल्या गावावरून आणखी हजारो लोकांना घेऊन येतात आणि तिथे त्यांना स्थायिक करून आपल्या व्होट बँका बनवतात. पुढे याच व्होट बँकांच्या जीवावर निवडणुका जिंकून सत्तेच्या शिड्या चडतात असे साधारण परप्रांतीयांनी चालवले आहे आणि याच परप्रांतीय पुढाऱ्यांच्या आणि त्यांच्या पक्षाच्या जीवावर परप्रांतीय फेरीवाले, रिक्षावाले, टॅक्सीवाले आदींची मुजोरी सुरू आहे आणि याला आपलेच पालिकेतील तसेच सरकारी कार्यालयातील अधिकारी चिरीमिरी घेऊन रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड आदी निवासाचे पुरावे बनवून देतात. त्यामुळे आज इथल्या स्थानिक लोकांपेक्षा परप्रांतीय अधिक शिरजोर बनलेत. सहाय्यक पालिका आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करावा तितका थोडा आहे. पण अशा हल्ल्याबाबत पालिका अधिकारी कुठल्या तोंडाने बोलतील? कारण या बेकायदेशीर फेरीवाल्यांकडून हप्ते घेऊन त्यांना फुटपाथ अडवण्याची किंवा रस्त्यात धंदा लावण्याची अप्रत्यक्ष परवानगी याच लोकांनी दिली आहे. म्हणून ते फेरीवाले बिनधास्त आहेत. आपण जर पालिका कर्मचाऱ्यांना हप्ते देतो, मग अधिकाऱ्यांनी आपल्यावर का कारवाई करावी असे त्यांचे म्हणणे आहे. पण त्याचे कल्पिता पिंपळे हिच्या सारख्या कर्तव्य कठोर अधिकाऱ्यांना परिणाम भोगावे लागतात. आता या भयंकर घटनेबाबत जे राजकीय पक्ष निषेधाचे चीटोरे नाचवत आहेत. त्यांनी आपल्या चड्ड्या सांभाळाव्यात नाही तर जे परप्रांतीय दिवसाढवळ्या एका महिला अधिकारीची बोटे छाटू शकतात त्यांच्यासाठी पुढाऱ्यांच्या चड्ड्याकाढून घेणे कठीण नाही. आज एका पालिका अधिकारी महिलेची बोटे तोडण्यात आली, उद्या पालिका आयुक्तांची गर्दन नाही छाटली म्हणजे झालं. आज सगळ्यांनाच कळले असेल की राज ठाकरे परप्रांतीयांबाबत जे इशारे देत होते ते किती खरे होते ते.

# सार्वजनिक आरोग्य सेवेतील मुजोरी!




**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

बेशिस्त सार्वजनिक आरोग्य सेवा सरकार सार्वजनिक आरोग्य सेवेवर कोट्यवधी रुपये खर्च करते. मात्र या सेवेचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या गोरगरीब, अल्पशिक्षित लोकांशी तिथले कर्मचारी कशाप्रकारे वागतात हे पाहिल्यानंतर भीक नको पण कुत्रा आवर अस म्हणण्याची पाळी येते. मुंबईसारख्या महानगरात नायर, केईएम, शताब्दी, सायन, भगवती, कूपर यासारखी अनेक मोठी रुग्णालये आहेत आणि तिथे सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक ती वैद्यकीय साधन सामुग्री सुधा आहे. तरीही तिथे उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांना वेगवेगळ्या प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. अगदी केस पेपर काढण्यापासून ते औषधे घेण्यापर्यंत रुग्णांची अक्षरशः दमछाक होते. याबाबत परळच्या केईएम रुग्णालयाचे उदाहरण देता येईल. केईएम हे महापालिकेचे रुग्णालय असून रोज येथे केवळ मुंबईतूनच नव्हे, तर मुंबईच्या आसपासच्या ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातून सुद्धा मोठ्या प्रमाणावर पेशंट येतात. अगदी पहाटे चार वाजल्यापासून केसपेपरसाठी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची रांग लागलेली असते. मात्र सकाळी ९ वाजता केसपेपर देणे सुरू झाल्यापासून रुग्णांच्या मागे जी साडेसाती लागते ती दिवसभर त्याला इथून तिथे तिथून इथे अशी हॉस्पिटलमध्ये गरगर फिरवायला लावते याचे कारण तिथे प्रोपर रुग्णांना मार्गदर्शन केले जात नाही. केसपेपर काढल्यानंतर त्या रुग्णाला जो आजार असतो, त्या आजारावर ज्या ओपीडीमध्ये तपासणी केली जाते तिथे त्याला न पाठवता दुसऱ्याच ठिकाणी पाठवले जाते. त्यामुळे तिथे तासभर रांगेत राहून जेंव्हा त्याचा नंबर येतो तेंव्हा त्याला सांगितले जाते की या विभागात नाही, तर दुसऱ्या विभागात तुझी तपासणी होईल अशा प्रकारे दिवसभर त्या रुग्णाला या विभागातून त्या विभागात त्या विभागातून आणखी कुठल्यातरी तिसऱ्या विभागात पाठवले जाते. आजारी माणूस अगोदरच शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या थकलेला असतो आणि अशा माणसाला जेंव्हा केईएम सारख्या रुग्णालयात चक्रा मरायला लागतात, तेंव्हा त्याचा आजार आणखी बळावतो आणि त्याला आराम पडण्याऐवजी त्याची प्रकृती आनखी बिघडते आणि याला कारणीभूत असतात या सरकारी रुग्णालयात काम करणारे मुजोर कर्मचारी! आणि अशा मुजोर कर्मचाऱ्याच्या विरोधात एखाद्या रुग्णाने किंवा त्याच्या नातेवाईकांनी तक्रार केली तरी रुग्णालय प्रशासन किंवा पालिकेचा आरोग्य विभाग त्या तक्रारीची दखल घेत नाहीत. कारण कर्मचाऱ्यांच्या ज्या युनियन असतात. त्या मुजोर कर्मचाऱ्यांची बाजू घेऊन त्यांच्या मदतीला धावतात. त्यामुळे एखाद्या मुजोर कर्मचाऱ्याने पेशंटला मारहाण केली तरी अशा गंभीर प्रकरणाची रुग्णालय प्रशासन किंवा पालिका दाखल घेत नाही. सरकारी रुग्णालये ही जनतेकडून कराच्या रूपाने मिळणाऱ्या पैशावर चालतात तरीही तिथे रुग्णांशी जर अरेरावी केली जात असेल तर कशाला हवीत ही सरकारी रुग्णालये? त्यापेक्षा सरकारी रुग्णालयांचे खाजगीकरण करून टाका म्हणजे या सरकारी रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मुजोरी कमी होऊन त्यांना शिस्त तरी लागेल. कारण पालिका प्रशासन युनियन समोर हतबल असल्याने त्यांच्याकडून मुजोर कर्मचाऱ्यांवर कारवाईची अपेक्षा करणे चुकीचे आहे. गेल्या काही वर्षांपासून रुग्णांचे नातेवाईक आणि रुग्णालय कर्मचारी यांच्यातील वादाच्या आणि मारहाणीच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे सरकारने रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कायदे केलेत, पण सरकारची ही कृती एकतर्फी आहे. जर रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तुम्ही कायदे करता तर रुग्णांच्या सुरक्षेचे आणि त्यांच्या अधिकाराचे काय? त्यांनी कोणाकडे न्याय मागवा याचे उत्तर सरकारने द्यावे आणि सार्वजनिक आरोग्य सेवेचा कधीतरी शिस्तीचे इंजेक्शन द्यावे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**



# ग्रामीण भागातील तरुणांना नेत्र तंत्रज्ञ होण्याची संधी

**लातूर/प्रतिनिधी**

माईर एमआयटी, पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालयातील बी. एस्सी. ऑप्टोमेट्री पदवी आणि डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री अभ्यासक्रमाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील, विशेष करुन ग्रामीण भागातील तरुणांना नेत्र तंत्रज्ञ होण्याची संधी उपलब्ध झाली असून या अभ्यासक्रमामुळे समाजासाठी अधिकचे नेत्र तंत्रज्ञ उपलब्ध होणार आहेत. शैक्षणीक वर्ष २०२१-२२ साठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या निर्देशानुसार विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बी. एस्सी. ऑप्टोमेट्री पदवी आणि डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येईल, अशी माहिती महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालयाचे अध्यक्ष तथा नेत्र तज्ज्ञ डॉ. हनुमंत कराड यांनी दिली. माईर एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील नेत्र विभागाच्या माध्यमातून गेल्या तिन दशकात रुग्णांच्या डोळ्यांची अत्याधुनिक उपकरणाव्दारे तपासणी, लेझर उपचार, तातडीचे उपचार, २४ तास रुग्णसेवा, उत्कृष्ठ सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचा चमु, नेत्रपेढी (आय बँक) या माध्यमातून रुग्णांप्रती असलेला सेवाभाव दाखवून दिलेला आहे. त्यासोबतच विविध सामाजिक उपक्रमातील सहभाग, डोळ्यांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संस्थांशी असलेले सबंध व कार्य याची दखल घेवून या संस्थेच्या महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालयातील बी. एस्सी. ऑप्टोमेट्री पदवी आणि डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री या दोन अभ्यासक्रमांना शासनाने मान्यता प्रदाण केलेली आहे. या अभ्यासक्रमांना शासनाने ठरवून दिलेल्या जात प्रवर्गनिहाय प्रवेश दिले जाणार असून एकुण प्रवेशापैकी १५ टक्के प्रवेश हे संस्थेच्या व्यवस्थापन



कोट्यातून दिले जाणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे नेत्र रोगांचे निदान व उपचार करणे आता सोपे झाले आहे. या क्षेत्रात पारंगत मनुष्यबळाची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्याअनुष्गाने देशात ऑप्टोमेट्री कॉन्शिल ऑफ इंडिया स्थापन झाली असून केंद्र शासनाने पॅरामेडीकल कोर्सेस संचालनालय व कॉन्शिल स्थापन होऊ घातली आहे. त्यांच्याकडे या पदविधरांना ऑप्टोमेट्री तंत्रज्ञ म्हणून स्वतंत्रपणे प्रॅक्टीस करण्याची परवानगी मिळणार आहे. त्यामुळे ऑप्टोमेट्री पदवीधारकांना प्राथमिक उपचारासाठी दृष्टी / व्हिजन सेंटर चालवण्याचा परवाना मिळणार आहे.महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालय हे वैद्यकीय महाविद्यालयाशी सलग्नित असणारे महाराष्ट्रातील एकमेव असून या महाविद्यालयाने पहिले दोन वर्ष यशस्वीपणे पुर्ण केले असून तिसऱ्या वर्षात पदार्पन करीत आहे. बी. एस्सी. ऑप्टोमेट्री पदवी आणि डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री या अभ्यासक्रमांचे नियमीत व दर्जेदार शिक्षण देणारे हे मराठवाड्यातील एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयामुळे लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील ग्रामीण भागातील तरुणांना नेत्र तंत्रज्ञ होण्याची संधी लातूर येथे उपलब्ध झाली आहे. प्रवेशास पात्र विद्यार्थी शासन नियमानुसार प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक निहाय शिष्यवृत्तीस पात्र असणार आहेत. विज्ञान शाखेतून १२ उत्तीर्ण (पी.सी.बी. ग्रुपसह) असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालय, लातूर येथे प्रवेश घेता येईल. प्रवेशपूर्व नोंदणीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी (०२३८२ - २२७२०७, मोबाईल नंबर ९०४९२९८५०२, ७९७२७०४८५०, ९७३०९५७६२७) या दूरध्वनीवर संपर्क करावा.दरम्यान नेत्रशास्त्र विषयात रोजगाराच्या नवनविन संधी उपलब्ध असून त्यासाठी लागणारी शैक्षणीक पात्रता व अनुभव असणाऱ्यांना स्वताचे करिअर घडविण्याची संधी उपलब्ध आहे. नेत्र तंत्रज्ञ होण्याकरीता मर्यादीत ठिकाणी मार्गदर्शन उपलब्ध असून महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ ऑप्टोमेट्री महाविद्यालयाने बी. एस्सी. ऑप्टोमेट्री पदवी आणि डिप्लोमा इन ऑप्टोमेट्री या अभ्यासक्रमांची सुरुवात करुन या क्षेत्रातील करिअरचे दालन उघडे केले आहे. या क्षेत्रात येवू पाहाणाऱ्या तरुणांना नेत्र तंत्रज्ञ अधिकारी म्हणून शासकीय रुग्णालयात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. त्याचबरोबर नेत्र तंत्रज्ञ म्हणून स्वता अथवा खाजगी नेत्र रुग्णालयात सेवा देता येईल, नेत्र उपकरणांची निर्मीती करणाऱ्या व्यवसायीक कंपण्यात तज्ञ म्हणून सेवा करता येईल, मेक इन इंडिया योजनेंतर्गत आयटेक कंपनीच्या माध्यमातून डोळ्यांसाठी लागणाऱ्या उपकरणांची निर्मीती करुन पुरवठा करता येईल व शॉपच्या माध्यमातून नेत्र उपकरणांची विक्रीही करता येईल, त्यासोबतच सामाजिक क्षेत्रातही काम करता येईल. शिवाय बी.एस्सी. ऑप्टोमेट्री पदवीधारक पदवी नंतरच्या सर्व स्पर्धा परिक्षांसाठी पात्र असणार आहेत, अशी माहिती नेत्र तज्ज्ञ डॉ. हनुमंत कराड यांनी दिली.

# रेणापुरात सोयाबीन संशोधन केंद्र स्थापण्याची मागणी!

**लातूर/प्रतिनिधी**

महाबीज कंपनीचे बीज उत्पादन करणाऱ्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे पैसे मिळावेत. सोयाबीनचे मोठे क्षेत्र असणाऱ्या रेणापूर तालुक्यात सोयाबीन संशोधन केंद्र स्थापन करावे,यासह विविध मागण्यांचे निवेदन शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी राज्याचे कृषीमंत्री दादाजी भुसे यांना दिले. लातूर येथील कृषी महाविद्यालयात कृषीमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत सोयाबीन परिषद आयोजित करण्यात आली होती.या परिषदेस खा.ओमराजे निंबाळकर, आ.कैलास पाटील, आ. ज्ञानराज चौगुले यांचीही उपस्थिती होती. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने कृषीमंत्र्यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, शिवाजीराव माने, महिला संघटक शोभाताई बेंजरगे, माजी जिल्हा प्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक सुनीता चाळक, लातूर तालुका प्रमुख अ‍ॅड.प्रविण मगर, उपजिल्हाप्रमुख डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर ग्रामीण मधील रेणापूर तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याची मागणी या निवेदनात करण्यात आली.

जिल्ह्यातील महाबीज बीज उत्पादक (seed plot) शेतकऱ्यांना ५३०० रुपयांच्या ऐवजी बाजारभावाप्रमाणे दर मिळावा.पुढील वर्षापासून बाजार भावाप्रमाणेच दर मिळावा.रेणापूर तालुक्यात सोयाबीन पीक संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे. तालुक्यातील मोटेगावसहित इतर काही दुष्काळप्रवण गावांचा पोखरा योजनेत समावेश करावा,आदी मागण्यांची स्वतंत्र निवेदने यावेळी देण्यात आली. येणाऱ्या वर्षी बाजाभवाप्रमाणेच भाव मिळावा अशी विनंती केली. कृषी मंत्र्यांनी शेतकरी व शिष्टमंडाळाची भेट घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करून विविध विषयांची नोंद घेतली. या विषयांवर लातूरमध्ये लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. ठाकरे सरकार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी लवकरच मोठे निर्णय घेणार आहे. यामुळे लातूर सोयाबीन उत्पादन आणि बाजारपेठेसाठी देशभरात ओळखले जाईल.दरवर्षी अशा राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय सोयाबीन परिषदेचे आयोजन करण्यासाठी प्रयत्न केले जातील असेही कृषिमंत्र्यांनी सांगितले.

# रिपाई (आ)ची निवडणूक निर्णय समिती गठीत होणार-बी.बी.मोरे



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

उल्हासनगर मधिल आरपीआय चे उपमहापौर, शहराध्यक्ष भगवान भालेराव यांच्या मनमानी मुळे पक्षाचे जुने पदाधिकारी कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन निवडणूक निर्णय समिती स्थापन केली असून त्याच्या माध्यमातून कामे केली जानार असल्याचे बैठकीत निर्णय घेतला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची आगामी निवडणूक लक्षात घेऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)च्या उल्हासनगर शहर जिल्हा कार्यकारीणीची बैठक पक्षाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष, माजी गटनेते बी.बी.मोरे, महाराष्ट्र कार्यकारीणीतील सचिव माजी नगरसेवक, सभापती नाना पवार यांच्या उपस्थितीत बी.बी मोरे यांच्या निवासस्थानी पार पडली. उल्हासनगर महापालिकेचे आरपीआयचे उपमहापौर, शहराध्यक्ष भगवान भालेराव हे शहरातील जुने कट्टर आरपीआय पक्षाचे पदाधिकारी यांना डावलून विचार घेत नसून स्वतः ची मनमानी करणे,२५ लाख असतिल तरच निवडणुकीत उभे रहा,असे बोलने,जुन्यांना लांब व नवख्यांना जवळ यामुळे आरपीआयची ताकद कमी होत असून त्याच्या विरोधात जुने पदाधिकारी यांनी एकत्र येऊन येणाऱ्या निवडणुकीत कमीत कमी १२ नगरसेवक निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार तसेच उल्हासनगर महापालिकेच्या होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत जर तिकीट वाटपाच्या शिफारस मान्य केली नाही तर पुढचे आम्ही बघु असे आरपीआय पक्षाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष बी.बी.मोरे यांनी सांगितले.आगामी निवडणुकीची रणनीती ठरवण्यासाठी एक समिती गठीत करण्यात येईल व या समितीस पक्षाचे नेते पक्षाध्यक्ष रामदास आठवले यांच्याकडून मान्यता घेण्यात येईल. या बैठकीस महत्वाचे रिपब्लिकन कार्यकर्ते आणि शहर जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते. यात माजी नगरसेवक, माजी जिल्हाध्यक्ष राजू सोनवणे, माजी नगरसेवक व माजी जिल्हाध्यक्ष जे.के. ढोके, माजी नगरसेवक शांताराम निकम, शहर जिल्हा महासचिव गंगाधर मोहोड, अंबादास गायकवाड, किशोर पवार, चंद्रकांत केदार, हरिभाऊ तायडे, महेंद्र अशोक बच्छाव, जॉनी डेव्हिड, कमलाकर सूर्यवंशी, जितू सरदार, विद्यार्थी संघटनेचे अ‍ॅड.नागसेन सूर्यवंशी, आयटी सेल चे उल्हासनगर अध्यक्ष जयेश जाधव, सुरजित पंजाबी उपस्थित होते.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अ‍ॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# कोरोनाकाळातही जैन इरिगेशनने नवीन १०६० जणांना दिली कायमस्वरूपी नोकरीची संधी

**जळगाव/प्रतिनिधी**

दोन वर्षाच्या कोरोना काळात केंद्र व राज्य सरकार यांनी वेळोवेळी पूर्णतः लॉकडाऊन आणि काही वेळा निर्बंध घातल्याचा प्रतिकूल परिणाम उद्योग-व्यवसाय-व्यापारावर झाला. बहुतांश उद्योगांमध्ये कामगार यांना दीर्घ सुटी देण्यात आली किंवा कामगार कपात करावी लागली तर काहींनी वेतन कपात केली. अशाही स्थितीत जळगावमधील जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. मध्ये असे काहि न करता विविध कामांसाठी पदांवर नव्याने १०६० जणांना कायमस्वरूपी नोकरीची संधी देऊन सामावुन घेतले आहे. जैन इरिगेशन आणि संलग्न उत्पादक कंपन्यांवर सध्या वित्त पुरवठा विस्कळीत झाल्याचे संकट आहे. तरीही सामाजिक बांधिलकी ठेऊन नियमित सहकारी (कामगार) शिवाय रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यात आल्या आहेत. सध्या जैन इरिगेशनच्या जळगाव स्थित आस्थापनामधे ६२५० कायमस्वरूपी सहकारी आहेत याशिवाय सरासरी २५०० ते ४५०० कंत्राटी कामगार गरजेनुसार सेवा पुरवित आहे. मार्च २०२० पासून भारतात कोरोना विषाणूचा संसर्ग वाढू लागला. जुलै २०२० पासून विषाणूच्या संसर्गाने बाधित रूग्ण संख्या सप्टेंबरपर्यंत लाखांच्यावर पोहचली. केंद्र सरकारने सलग तीन वेळा लॉकडाऊन वाढवले. त्यामुळे उद्योगातील उत्पादन निर्मिती थांबली. कच्चामाल पुरवठा थांबला. जे उत्पादन तयार होते ते पोहचवले जात नव्हते. अशा स्थितीत आर्थिक अडचणी अजून वाढल्या. हे सर्व अनुभवाला येत असतानासुद्धा जैन इरिगेशनच्या व्यवस्थापनाने महामारी व लॉकडाऊन काळात नियमित कामगाराचा रोजगार कमी करायचा नाही असा महत्त्वपूर्ण असा निर्णय घेतला. खाजगी संस्थाना लस विकत घेण्याची परवानगी मिळालेनंतर जैन इरिगेशनने कोरोना प्रतिबंधक लस खरेदी करून सर्व सहकाऱ्यांना टोचणी करून घेतली. या लसीकरणाचा लाभ ४६०० कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. याशिवाय कामावर येणाऱ्या सर्व सहकारी-कामगारांची लसीकरणाची व्यवस्था करून या सहकाऱ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन व तपासणी करण्यासाठी १० डॉक्टर तसेच १७ वैद्यकीय सहाय्यकांचे पथक रोज कार्यरत होते व आहे. जैन इरिगेशन व्यवस्थापनाने वेळोवेळी सहकारी-कामगारांशी परिपत्रकांद्वारे संपर्क करून कोरोनाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, आजारपणात घ्यायची काळजी, आजार बरा झाल्यानंतर पश्चात घ्यायची काळजी याविषयी कामगार व त्यांच्या कुटुंबात जागृती केली आणि करीत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव संपर्कातून होतो हे लक्षात घेऊन उत्पादन निर्मिती पाळ्यांमध्ये अर्धा तासाचे अंतर वाढविले. या काळात योग्य पद्धतीने कामाची जागा सॅनिटायझर केली. या शिवाय कामगारांमधील अंतर सोशल डिस्टन्सिंगच्या नियमानुसार राखले. कंपनीच्या आवारात जेवणाची व्यवस्था बदलली. बंदिस्त जागेतून खुल्याजागेत योग्य अंतरावर बसायची व्यवस्था केली आहे. काही कामगारांना वर्क फ्रॉम होमची सवलत देण्यात आली. बाहेरगावाहून कंपनीत कामावर येणाऱ्यांसाठी आरोग्याची माहिती देणारे ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले होते. रोज कामावर येणाऱ्या सहकाऱ्यांची प्रवेशद्वारावर ऑक्सिमीटर व थर्मामीटरने वेळोवेळी तपासणी केली जाते. तेथे साबणाने हात धुवून सॅनिटायझर फवारणीची व्यवस्था केली आहे.

> करोना काळात सर्वच उद्योगांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले याही परीस्थितीत जैन इरिगेशनने कामगार कपाती याऐवजी नव्याने १०६० लोकांना कायमस्वरूपी सामावून घेतले यासह त्यांचा सुरक्षिततेसाठी संपूर्ण लसिकरण, दुचाकी वाहन योजना, आरोग्याची पुरेपुर काळजी घेत असल्याने कंपनी आपले उत्पादन नियमीत सुरू ठेऊ शकत आहे.
>
> – अतुल जैन, सहव्यवस्थापकीय संचालक, जैन इरिगेशन सिस्टीम्स् लिमीटेड



**कामगारांसाठी विशेष योजना**

लॉकडाऊन काळात काही कामगारांचे येणे-जाणे सुरक्षित व्हावे यासाठी व्यक्तिगत दुचाकी वाहन खरेदी योजनेत कंपनीकडून ६० टक्के उचल दिली गेली. त्यात १४४ महिला तसेच २५५ पुरूष अशा एकूण ३९९ कामगारांनी लाभ घेतला. कंपनीमध्ये कोरोनाच्या तपासणी शिबिर घेऊन ५३६७ सहकारी-कामगारांची न्टीजन टेस्ट करून घेतली. एवढी काळजी घेऊनही जे कामगार कोरोना संसर्गामुळे आजारी झाले त्यांना तातडीने वैद्यकीय मदत देण्यासाठी खास पथक आहे. या पथकाचे नियंत्रण कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांच्याकडे आहे. या पथकाने वेळोवेळी तज्ज्ञ डॉक्टरांशी सल्ला-मसलत केली. कामगारांच्या विविध वैद्यकीय चाचण्या केल्या. संसर्ग बाधित कामगाराला दवाखान्यात बेड गरजेनुसार ऑक्सिजन, इतर उपकरणे उपलब्ध करून दिली यासह रूग्ण कामगार व कुटुंबाची भोजन व्यवस्था केली.


**कामगारांच्या वारसांना रोजगार व शिष्यवृत्ती**

कोरोना प्रकोपाच्या काळात योग्य काळजी घेऊनही दुर्दैवाने जैन उद्योग समुहातील काहि सहकाऱ्यांचा मृत्यू झाला. त्या कामगारांच्या कुटुंबास योग्य ती आर्थिक मदत दिली गेली या सह त्या कामगारांच्या वारसाला त्याच्या शिक्षण व गुणवत्तेनुसार कायम स्वरुपाचा रोजगार देण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षण घेत असलेल्या पाल्याच्या मूलभूत शिक्षणाचा खर्चही कंपनी उचलणार आहे. काही कामगाराचे पाल्य, पत्नी हे कामावर रुजू ही झालेले आहेत.

**मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा अधिकाऱ्यांना मोठा दिलासा**

# अधिकाऱ्यांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यास कुटुंबातील सदस्यास नोकरी

**मुंबई/प्रतिनिधी**



मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना फार मोठा दिलासा दिला आहे. सध्या शासकीय सेवेतील एखाद्या गट 'क' किंवा गट 'ड' कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्याला अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते. आज राज्य मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे की, गट अ आणि गट ब मधील अधिकाऱ्यांच्या बाबतीत देखील हे अनुकंपा धोरण लागू करावे. कोविड परिस्थितीत अनेक अधिकाऱ्यांचे निधन झाले असून अधिकारी संघटनांची देखील हे अनुकंपा धोरण लागू करण्याची मागणी होती. मुख्यमंत्र्यांनी या मागणीप्रमाणे कार्यवाही करण्याची सूचना केली होती. त्या अनुषंगाने आज यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत आणण्यात आला. या निर्णयामुळे राज्यातील अधिकाऱ्यांच्या निधनामुळे ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. गट 'अ' किंवा गट 'ब' मधील अधिकाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट क किंवा गट 'ड' मध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात येईल. याशिवाय अनुकंपा नियुक्तीसाठीचे विविध आदेश एकत्रित करून महाराष्ट्र राज्य शासन अनुकंपा नियुक्ती नियम २०२१ तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे, यामुळे अनुकंपा संदर्भातील प्रशासकीय अडचणी दूर होतील.

# लुटमारकरणाऱ्या आरोपीच्या लातुर ग्रामीण पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**लातूर/करकरे अंबादास**

पोलीस ठाणे लातुर ग्रामीण येथे फिर्यादी नामे व्यंकटेश ब्रिजलाल माहुरे वय २७ वर्ष व्यवसाय डॉक्टर रा. एमआयटी कॉलेज हॉस्टेल अंबाजोगाई रोड लातुर यांनी फिर्याद दिली कि, फिर्यादी व त्यांची मैत्रीण असे मोटार सायकलवर फिरत फिरत अंबाजोगाई रोडवरील हॉटेल कार्निवल चे पुढे मोटार सायकल उभी करुन रोडवर गप्पा मारत थांबले असता एका मोटार सायकलवर तिन अनोळखी इसमांनी त्यांना चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे मैत्रीनीच्या गळयातील ८ ग्रॅमची सोन्याची चैन दोघांचे दोन मोबाईल व घडयाळ असा एकुण ६४ हजार रूपायाचे मुद्देमाल जबरदस्तीने काढुन घेवुन निघुन गेले वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे. लातुर ग्रामीण येथे गुरनं २०५/२०२१ कलम ३९२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास पोउपनि श्री व्यंकट पडीले यांचेकडे देण्यात आले होते. सदर गुन्हयाचे तपासात पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधिक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो.स्टे. लातुर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी आरोपी व गेलेल्या मालाचे शोध कामी पो.स्टे. लातुर ग्रामीण येथील दोन वेगवेगळे पथके तयार करुन सदर पथकांनी गुप्त बातमीदारा मार्फत माहीती मिळवून सदर गुन्हयातील आरोपी हे म्हाडा कॉलनी परिसरातील राहणारे असल्याची माहीती मिळाल्याने तेथील संशयीत ईसम सचिन नंदु चंडाळे रा. म्हाडा कॉलनी लातुर यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्यांचे अंगझडतीत गुन्हयातील गेलेल्या मालाचे वर्णनापैकी एक मोबाईल मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन ईतर दोन आरोपी विठ्ठल गोविंद वाघमारे रा. लेबर कॉलनी लातुर महादेव ऊर्फ भैया उत्तम सातपुते रा. लेबर कॉलनी लातुर यांचा शोध घेऊन त्यांना शिताफिने पकडुन त्यांचेकडे विचारपुस करता तिनही आरोपींनी गुन्हा केल्याचे कबुल केल्याने आरोपींना सदर गुन्हयात अटक करुन न्यायालयासमक्ष हजर करुन त्यांची पोलीस कस्टडी घेवुन आरोपी यांचेकडुन गुन्हयातील गेलेल्या मालापैकी दोन मोबाईल, सोन्याची चैन गुन्हयात वापरलेले हत्यार व मोटार सायकल असा एकुण १ लाख २ हजार रुपयेचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर पथकात पोलीस स्टेशन लातुर ग्रामीण चे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि तानाजी चेरले माधव, लोणेकर, व्यंकट पडीले पोह / गजाजन टारपे, महेबुब तांबोळी, विनोद लखनगीरे, पोकॉ/ राहुल दरोडे, संतोष थोरात, सतिष लामतुरे सचिन चंद्रपाटले, महिला पोलीस अंमलदार सुमन शेळके, लता जाधव सायबर सेलचे पोलीस अंमलदार प्रदिप स्वामी व चालक संतोष हजारे दाजीबा यादव, किशोर आळणे, चंद्रकांत केंद्र यांनी कामगिरी केली आहे.

**कविता**

## पोळा ..

पोळा आला रे आला
नाही कमी आनंदाला
करू सण पध्दतीने
सांगावेत्या कोरोनाला

घालू बांध नियमांचा
पार नाही उत्साहाला
सण नाही असे प्राण
नको नाट उत्सवाला

बैल नाही मुले माझी
सुख देऊ लेकराला
देखावा न सोहळ्याचा
मना मध्ये हो उमाळा

अंगणात सजवा छान
गोड धोड खाऊ घाला
हात फिरता पाठीवरी
मुक जरी कळे त्याला

भले होऊ नका गोळा
अनावश्य खर्च टाळा
पाहुनिया रूपडे असे
रोग बोले पळा पळा

– हेमंत मुसरीफ, पुणे
www.kavyakusum.com

# गणेश मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रम



**वाडा/प्रतिनिधी**

वाड्यातील शिवाजी नगर येथील साईवर्षा गृहसंकुल येथे सालाबादप्रमाणे या वर्षी देखील गणेश मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून वर्धापनदिन सोहळा जल्लोषात साजरा करण्यात आला. गोपाळकाला सणाच्या शुभमुहूर्तावर यावर्षी साईवर्षा सोसायटीच्या आवारात सदनिका धारकांकडून प्रथम श्रीगणेश मंदिरात मूर्ती अभिषेक करून येथील प्रतिष्ठित दाम्पत्याकडून भक्तिभावाने पूजा करण्यात आली. दुपारी युवक व बालगोपालांच्या अफाट जल्लोषात दहीहंडीफोडण्यात आली तर सायंकाळी सोसायटीच्या गुणवंत विध्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून भविष्यातील पुढील वाटचाली साठी शुभेच्छा देऊन गौरविण्यात आले, रात्री महिलांच्या संगीत खुर्ची खेळाने व उखान्यांच्या स्पर्धेने कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला तर सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला. सोसायटीतील जेष्ठांच्या व महिलांच्या सुश्राव्य संगीत भजनाने उपस्थिताना मंत्रमुग्ध करून अतिशय जल्लोष पूर्ण वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. रात्री उशिरापर्यत भजनाचा कार्यक्रम रंगला होता.


## वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती 'ए', बोळींज

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचितील प्रकरण ८ मधील कलम १(१) व १(२) अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोद घेतली जाईल.

| अ. क्र. | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटिसीची मालमत्ता क्रमांक | करनिर्धारण पुस्तकातील वॉर्ड नं. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | जांचे नांवे मलमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नांव किंवा अभिहस्तांकन कत्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन कत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १५/१२/२०२० | ५९/२ | १३ | गुलमोहर कॉम्पलेक्स, ए/३, विरार | निवासी | स्वप्नील संतोष महाडिक | सुरज शंकर वरणकर |
| २. | ३१/१२/२०२० | ५६७/९६ | १७ | ए-४, बि नं.२, शाश्वत अपार्टमेंट, ग्लोबलसिटी, विरार प. | निवासी | राजीव सिंग व मोनालीसा गोएल | हर्षीत सिंह व पल्लवी त्यागी |
| ३. | १८/१२/२०२० | ९५/१३ | १४ | रूम नं.३०२, येसुबाई को.ऑप.सो. डोंगरपाडा रोड, विरार प. | निवासी | दत्ताराम गणपत भगत | स्मिता राजेंद्र मोकाशी व राजेंद्र मोकाशी |
| ४. | ०४/०२/२०२१ | ५६३/१११ | १५ | एचडीआयएल रेसिडेन्सी पार्क, बि नं. ए | वाणिज्य | सरोज नरेश दोशी | मोहम्मद आरीफ खान व फातिमा आरीफ खान |
| ५. | १८/१२/२०२० | ११६/३१ | २९ | सी-३०९, ओमसाई प्रसाद, सी. ३०९, हिरा विद्यालयरोड, विरार प. | निवासी | ज्ञानोबा बाबुराव बागले | मुन्ना साहु |
| ६. | २४/११/२०२० | ९६/४९ | २७ | रूम नं. २०२, चरीस समृद्धी को.ऑप.हौ.सो. बि. नं. १५ | निवासी | निशा मलिक व राजलक्ष्मी प. तिवारी | मंगलदास एम. शाह |
| ७. | १८/०१/२०२१ | VR/१२/१४ | १० | ए-२०१, यनिक को.सो.पी.पी. मार्ग, विरार प. | निवासी | गोविंद रणछोडदास खोडा | राजेंद्रकुमार आत्माराम तामोरे |
| ८. | १९/०१/२०२१ | १८१/१४ | २४ | ए-२०१, श्याम गार्डन, चाणाय चौक, विराट नगर, विरार | निवासी | मयुर चावला | राजेश रमाकांत चुरी व निलीमा राजेश चुरी |
| ९. | २०/०१/२०२१ | ६७/३१ | २४ | हंसराज अपार्टमेंट, ए/२०४, पद्मा कॉलणी, गांवठाण, विरार प. | निवासी | पुष्पाबेन मनसुखलाल शेठ | वत्सल अशोक शेठ |
| १०. | २१/१२/२०२० | ६१३/१०१ | १७ | १०३, अगरवाल लाईफस्टाईल, एवेन्यू बी-१, बि.नं.४, ग्लोबलसिटी, चिखलडोंगरे | निवासी | विजय समुंदर बोथ | राजेश सुदर्शन भामरे |
| ११. | २१/१२/२०२० | ६४२/२४४ | १७ | एचडीआयएल ले आऊट, चिखलडोंगरे रोड, रचना टॉवर बि.नं.७, विरार प. | निवासी | देवारती गुप्ता | अर्चना प्रमोद मेघश्याम |
| १२. | १९/०१/२०२१ | ८२/२ | १३ | यशवंत साक्षी, रूम नं. ए/००२ | निवासी | प्रविण प्रभाकर रत्नाकर | बबन चंद्रकांत कोकीतकर |
| १३. | १८/०१/२०२१ | ६१३/१३४ | १७ | २०४, अगरवाल लाईफ स्टाईल एवेन्यु, बि.नं.०५, चिखलडोंगरी रोड, विरार प. | निवासी | कल्पा मितेश भाटीया व मितेश भाटीया | देवेन बि. शाह |
| १४. | १०/०६/२०२१ | ९६/५ | ११ | युनिक प्लाझा | निवासी | रामगोपाल पी. खंडेळवाल | मदनलाल रामगोपाल खंडेलवाल व दिशा मदलाल खंडेलवाल |
| १५. | १०/०६/२०२१ | ८/९/२००२ | १० | अपोलो बिल्डींग, शॉप नं. १२ | वाणिज्य | मोहम्मद रशिद मोहम्मद नबी | अजयराज विजयराज जैन व प्रीतीबाला अजयराज जैन |
| १६. | १०/०६/२०२१ | १६५/१४ | ११ | तुलसी को.ऑप.हौ.सो. रू. नं. १०२, विजया बँकेच्या मागे, आगाशी रोड, विरार प. | निवासी | अशरफ इ. अहमदाबादी | सुफिया अशरुअली अमदाबादी |
| १७. | १०/०६/२०२१ | २०९/४ | १० | गंगा को.ऑप.हौ.सो. रू नं. १०१ | निवासी | कटपाडी अनिलकुमार शेणॉय | अजयकुमार गुप्ता |
| १८. | ११/०६/२०२१ | १५/१० | ११ | लक्ष्मी विलास को.हौ.सोसायटी, विराट नगर | निवासी | एन. जे. कानेरे | दशरथ बारकु गजमल व दर्शना दशरथ गजमल |
| १९. | ११/०६/२०२१ | ६८/१२ | १२ | विष्णुप्रसाद कॉम्पलेक्स, बी/१०४, पद्मा कॉलणी, गावठण | निवासी | आशा दत्तात्रेय चौबळ | प्रशांत दत्तात्रेय चौबळ |
| २०. | ११/०६/२०२१ | ६८/११ | १३ | विष्णुप्रसाद कॉम्पलेक्स, बी/१०४, पद्मा कॉलणी, गावठण | निवासी | आशा काशिनाथ चौबळ | प्रशांत दत्तात्रेय चौबळ |

जावक क्र. : वविशम/बोळींज/५७७/२०२१-२२
दिनांक : ०१/०९/२०२१

सही/-
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'ए', बोळींज
वसई-विरार शहर महानगरपालिका

06 TO 12 SEPTEMBER 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 04/09/2021 5:44 PM Page 1



पान १ वरून....

## मुलाच्या हातून मेला दारुडा पिता...

जमीनीची वाटणी झालेली नसतांना महादेव औटे हे शेतीवर पिककर्ज घेण्याच्या तयारीत होते. महादेव औटे यांनी पिककर्ज घेतल्यास हाती आलेली रक्कम ते दारु पिण्यात खर्च करुन टाकतील अशी भिती त्यांचा मोठा मुलगा योगेश यास सतावत होती. त्यामुळे त्याचा पिककर्ज घेण्यास विरोध होता. त्यातून घरात वाद सुरु होते. सोमवार २३ ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे योगेशचे त्याचे वडील महादेव औटे यांच्यात वाद सुरु झाला. या वादाचे पर्यावसन हाणामारीत होण्यास वेळ लागला नाही. हाणामारीच्या वेळी मुलगा योगेश याने जन्मदात्या महादेव औटे यांच्यावर थेट कुऱ्हाड चालवली. या हल्ल्यात महादेव औटे जखमी झाले. त्यानंतर काही वेळाने सर्वजण झोपी गेले. मात्र गंभीर जखमी अवस्थेतील महादेव औटे यांनी झोपेतच आपले प्राण सोडले होते. मध्यरात्री अकरा वाजेच्या सुमारास त्यांचा लहान मुलगा गणेश यास शंका आली. आपल्या वडीलांचा आवाज बंद झाल्याचे त्याच्या लक्षात आले होते. त्यामुळे आलेल्या शंकेतून त्याने पाहिले असता त्याचे वडील महादेव औटे मयत अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यामुळे त्याने सर्वांना हा प्रकार सांगून जागे केले. आपल्या वडिलांच्या खूनाचे बालंट आपल्या सर्वांच्या अंगाशी येईल याची सर्वांना भिती वाटू लागली. त्यामुळे जवळच्या नातेवाईकांना बोलावून वडिलांचा झोपेतच मृत्यू झाल्याचा कांगावा करत अंत्यसंस्कार करण्याचे नियोजन करण्यात आले. मध्यरात्रीच अंत्यसंस्कार आटोपल्याने व तत्पुर्वी मयत महादेव आणि त्यांचा मुलगा योगेश यांच्यात जोरदार वाद झाल्याचे गावातील काही लोकांना समजले होते. संशयास्पद अंत्यसंस्काराची कुणकुण गावकऱ्यांना लागली होती. २४ ऑग़स्टच्या सकाळी अज्ञात व्यक्तीने या संशयास्पद अंत्यसंस्काराची माहिती पाटोदा पोलिस स्टेशनला कळवली.

माहिती मिळताच पाटोदा पोलिस स्टेशनचे पो.नि. मनीष पाटील यांनी आपले सहकारी स.पो.नि. कोळेकर, पो.कॉ. आदिनाथ तांदळे यांच्यासह अंत्यसस्कार झालेल्या जागी भेट दिली. दरम्यानच्या कालावधीत मृतदेह जळून गेलेला होता. पोलिस पथकाने मयत महादेव औटे यांचा मुलगा योगेश (३२), लहान मुलगा गणेश (२९) व इतर नातेवाकांची चौकशी सुरु केली. चौकशीदरम्यान महादेव औटे हे घरातच दारु पिल्याने मयत झाल्याचे पोलिसांना सांगण्यात आले. मात्र त्यांच्या चेहऱ्याचा रंग उडाला होता. मयत महादेव औटे यांची मुले काहीतरी लपवत असल्याचे पोलिसांना जाणवले. मात्र त्यातील काही जण पोलिस चौकशीत बिथरले. त्यांनी पोलिस पथकाला झालेल्या घटनेची माहिती दिली. चुलते विष्णू, वाल्मीक व परमेश्वर औटे यांना या सर्व घडामोडीची माहिती होती. आपल्या परिवारातील लोक तुरुंगात जाऊ नये या हेतून त्यांनी हा प्रकार लपवून ठेवला होता. पोलिस कारवाईच्या भितीने परिवारातील सदस्यांनी रातोरात अंत्यविधी उरकून घेतला होता. पोलिसांना आलेल्या निनावी फोनमुळे हा प्रकार उघड झाला होता. जन्मदात्याच्या खूनाचे बालंट आपल्या अंगी येऊ नये यासाठी हा सर्व खटाटोप करण्यात आला होता. पोलिस उप अधिक्षक विजय लगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. मनीष पाटील, स.पो.नि. कोळेकर, पो.कॉ. तांदळे, सानप, कातखडे, तांबे, घुमरे, क्षीरसागर, सोनवणे आदी या प्रकरणी अधिक तपास करत आहेत. दोघा भावांसह तिघे चुलते असे पाच जण अटकेत आहेत.

## बालिकेचे अपहरण करून त्या फसल्या...

इश्वराच्या मर्जीने त्यांना मुलीऐवजी दुसरा देखील मुलगाच झाला. आपल्या संसारवेलीवर मुलीची अपेक्षा असतांना मुलगा झाला म्हणून या दाम्पत्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरु होता. कुणाच्या झोळीत काय टाकावे याचा सर्वस्वी निर्णय त्या अज्ञात शक्तीच्या हातात असतो याची जाणीव त्या मद्यपी पतीला नव्हती. त्यामुळे तो पत्नीसोबत वाद घालत होता. आपल्या सुनेसोबत मद्यपी मुलगा घालत असलेला वाद बघून सासूने सुनेला सोबत घेत रिक्षाने जालना येथून औरंगाबाद गाठले. सुन राधा शर्मा व सासू वनमाला या दोघींनी भाड्याच्या रिक्षाने औरंगाबाद येथील मध्यवर्ती बस स्थानक, रेल्वे स्टेशन आणि घाटीसह विविध झोपडपट्टीचा परिसर धुंडाळला. एखादी लहान बालिका उचलून तिचे अपहरण करायचे हा विडा दोघींनी उचलला होता. रिक्षाने फिरता फिरता दोघींनी औरंगाबाद येथील धुत हॉस्पीटल परिसरातील एका झोपडीजवळ रिक्षा उभी करण्यास सांगितले. मजूर कुटूंब राहणा-या त्या झोपडीत सुमारे तिन वर्षाच्या एका बालिकेवर त्या सासू - सुनेची वक्रदृष्टी पडली. त्या तिन वर्षाच्या बालिकेचे शिताफीने अपहरण करत दोघींनी पुन्हा त्याच रिक्षाने जालना गाठले. घरी आल्यावर या बालिकेला दत्तक घेतल्याचे त्यांनी सर्वत्र गाजावाजा केला. बालिका दत्तक घेतल्याचे सांगत परिसरात सतरा किलो जिलेबीचे वितरण केले. त्यानंतर काही दिवस असेच निघून गेले. मात्र इकडे आपली तिन वर्षाची मुलगी हरवल्यामुळे औरंगाबाद येथील मजूर परिवार हैरान झाला होता. नेहमी नजरेसमोर राहणारी बालिका अचानक बेपत्ता झाल्यामुळे हा मजूर परिवार हवालदिल झाला. धुत हॉस्पीटलजवळ झोपडपट्टीत राहणाऱ्या या मजूर परिवाराने रडत रडत १२ ऑगस्ट रोजी सिडको एमआयडीसी पोलिस स्टेशन गाठले. आपली मुलगी हरवल्याचे या परिवाराने धाय मोकलून रडत रडत प्रभारी निरीक्षक विठ्ठल पोटे यांच्याजवळ कथन केले. या परिवाराचे दुख: बघून खाकी देखील काही वेळ गहिवरली. या प्रकरणी बालिकेच्या अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला. पो.नि. विठ्ठल पोटे यांनी आपले सहकारी उप निरीक्षक अमरनाथ नागरे, मीरा लाड यांच्या मदतीने पुढील तपास सुरु केला. स्थानिक गुन्हे शाखेचे पवन इंगळे यांचे पथक देखील दिमतीला आले. घटनास्थळ असलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणीच्या कामाला प्रचंड वेग देण्यात आला. डोळ्यात तेल घालून सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासण्यात आले. अखेर एक संशयास्पद रिक्षा तपासणी पथकाला आढळून आली. रात्रीची वेळ असल्यामुळे त्या रिक्षाचा क्रमांक सिसीटीव्ही कॅमे-यात धुसर झाला होता. मात्र त्यातही एक महत्वाचा दुवा मिळाला. माँ की दुआ असे त्या रिक्षावर लिहीलेले आढळून आले. या वाक्याच्या जोरावर तपासकाम रेटून नेण्यात आले. लागलीच बस स्थानक परिसरातील बस स्थानक आणि रेल्वे स्टेशन परिसरातील रिक्षांची पाहणी करण्यात आली. माँ की दुआ असे लिहिलेल्या रिक्षाचा सर्वत्र शोध घेण्यात आला. एवढ्यावरच हा तपास थांबला नाही तर जालना, परभणी व बिड सह उस्मानाबाद येथील बस स्थानक व रेल्वे स्टेशन परिसरातील सदर वाक्य लिहिलेल्या रिक्षांची पाहणी करण्यासाठी खबरे कामाला लावण्यात आले. या शोधाशोध कार्यात जालना येथे त्या रिक्षाचा तपास लागला. जालना शहरातील राजीव नगर भागात ती रिक्षा असल्याची माहिती खब-यांकडून पुढे आली. पोलिस उप निरीक्षक अमरनाथ नागरे, हे.कॉ. दयाराम ओहळ, देविदास काळे, अविनाश दाभाडे व नितेश सुंदर्डे यांच्या पथकाने जालना गाठत त्या रिक्षाचालकाला चौकशीकामी ताब्यात घेतले. रिक्षा चालकाने दारु विक्री करणा-या वनमाला मुन्नालाल शर्मा (५२) व तिची सुन राधा रवी शर्मा (२७) यांच्या घराकडे बोट दाखवले. या दोघींनी त्याच्या भाडोत्री रिक्षाने जालना ते औरंगाबाद असा प्रवास केला होता. औरंगाबाद येथील धुत हॉस्पीटल परिसरातील झोपडीत राहणा-या बालिकेला रात्री झोपेत असतांना पळवुन आणले होते. या बालिकेला दत्तक घेतल्याचे सांगत सुमारे सतरा किलो जिलेबी वितरीत करुन जल्लोष करण्यात आला होता. आता आपले काहीच होणार अशा अविर्भावात सर्व जण दैनंदीन कामाला लागले होते. अखेर पोलिस पथक या सासू सुनेकडे येवून धडकले. त्यांना अपहरण केलेल्या बालिकेसह ताब्यात घेण्यात आले. तब्बल आठ दिवसांच्या प्रतिक्षेनंतर बालिका आपल्या आईच्या कुशीत विसावली. दुसरी मुलगी हवी होती मात्र मुलगाच झाल्यामुळे या दोघींनी मुलीचे अपहरण केले होते.

## मित्राचा विश्वासघात करून पत्नीलाच...

मृतदेह पाण्यावर तरंगत असल्याची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्हैय्या थोरात यांनी पथकासोबत घटनास्थळाकडे धाव घेतली होती .मृतदेहाची पाहणी केली असता त्याच्या शरीरावर टॅट्यू असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी प्रथम अकस्मात मृत्यूची नोंद करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मुंबईच्या जे.जे. रुग्णालयात पाठवण्यात आला होता.मयताचे वय ३६ वर्ष आणि त्याच्या शरीरावर टॅटू गोंदलेला असल्याची माहिती विठ्ठलवाडी पोलिसांनी सर्व पोलिसांना पाठवली होती. माहितीच्या आधारे हा मृतदेह चंद्रकांत शेलार ह्या नाका कामगाराचा असून तो नवी मुंबई येथील रबाळे येथून हरवला असल्याचे समोर आले. तसेच शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात चंद्रकांतच्या गळ्यावर तिक्ष्ण हत्याराचा वार असल्याचे निष्पन्न झाल्याने या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलिसांनी अपहरण आणि हत्येचा गुन्हा अज्ञात इसमांविरोधात दाखल करण्यात आला होता. तेव्हा विठ्ठलवाडी पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी पथक तयार करण्यात आले.पथकाने विविध पोलीस स्टेशनशी संपर्क साधून बेपत्ता असल्याची माहिती तपासली होती.पोलिसांनी केवळ टॅटूच्या आधारे मयतांच्या कुटुंबियांचा शोध सुरू केला होता.मयताच्या नातेवाइकांशी संपर्क साधल्यानंतर मयताच्या पत्नीने मयताची ओळख पटल्याची कबुली दिली.तेव्हा पोलिसांनी तपासाचे चक्र फिरवीत आरोपीचा शोध सुरू केला होता.मयताचे नातेवाईक व मित्रांची देखील चौकशी झाली.त्यात घराशेजारी राहणारा मित्रच वैरी निघाला.पोलिसांनी खुनी मित्राची कसून चौकशी केली.चौकशी दरम्यान धक्कादायक प्रकारची माहिती समोर आली.आरोपी हा मयताच्या पत्नीला वारंवार फोन करत होता.ह्या वारंवार फोनच्या संभाषणाला मयत व्यक्ती चंद्रकांत याचा विरोध होता.तेव्हा आरोपी व त्याच्या मित्राने कल्याणच्या चिंचपाडा परिसरात दारू पिण्यासाठी ये आपण सोबत दारू पिऊन या बहाण्याने त्याला बोलवून घेतलं होतं.

मयत व्यक्ती हा मजूर कामगार असल्याने त्याला दारूच प्रचंड व्यसन होत. मयत व त्याचे मित्र कल्याणच्या चिंचपाडा परिसरात दारूची पार्टी करण्यासाठी आले होते.तेव्हा आरोपी साजन मारोती कांबळे व डीवाईन टेलेस घोनसालविन यांनी मिळून मद्यधुंद अवस्थेत तीक्ष्ण हत्याराने वार करून त्याचा खून केला.खुनानंतर त्याला एका तलावात फेकून पसार झाले होतेत्या तलावात मयत चंद्रकांत शेलार ह्याची बॉडी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचपाडा आढळल्याने एकच खळबळ उडाली होती. अखेर विठ्ठलवाडी पोलिसांनी ४८तासांच्या आत मारेकऱ्यांना गजाआड केले.दोन आरोपींना न्यायालयात हजर केले जाणार असल्याची माहिती परिमंडळ -४ चे पोलीस उपाआयुक्त प्रशांत मोहिते यांनी दिली आहे.सदरची कामगिरी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कन्ह्याया थोरात,पोलीस निरीक्षक (गुन्हे) धनंजय कापरे,पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत,पोलीस नाईक निलेश तायडे,पोलीस नाईक गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल मंगेश विर यांनी केली आहे.

## दारुवरून झालेला वाद प्राणावर बेतला...

मित्रांच्या बरोबर पार्टया करणे यातच तो जास्त रमत होता.त्याच्या या वागण्याने त्याचे घरचे लोक ही वैतागलेले होते.त्यांनी त्याला याबाबत बऱ्याच वेळेला सांगून आणि समजावून ही पाहिले होते.पण तो काही त्याचे ऐकत नव्हता.आपले तेच म्हणणे खरे म्हणत तो आपल्याच तालात राहत होता. मिळेल त्या वेळी काम करणे रिकाम्या वेळेत मित्रांच्या बरोबर दारूची पार्टी करणे आणि चकत्या पिसणे एवढाच त्याचा उदयोग होता. घरच्या लोकांच्या दृष्टीने तो वाया गेलेला होता.तरीही ते त्याला सावरायचा प्रयत्न करीत होते. अशातच २८ जुलै २०२१ रोजी तो घरातून बाहेर पडला तो त्या दिवसी रात्री उशिरा पर्यत घरी परतला नाही.दुसऱ्या दिवशी त्याच्या घरच्या लोकांनी त्याचा शोध घेतला पण तो काही मिळून आला नाही. त्याच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतू त्याचा मोबाईल ही बंद होता. एक दोन दिवस वाट बघून त्याच्या घरच्या लोकांनी मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनला संपर्क साधून दत्तात्रय झांबरे हा दि.२८ जुलै पासून बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्या दिलेल्या तक्रारीत त्यांनी दत्तात्रय हा त्याचे गावातील मित्र अमोल खामकर आणि सागर सावंत यांनी त्याला बोलावून नेल्याची माहिती पोलीसांना दिली होती. बेपत्ता दत्तात्रय झांबरे याचा पोलीस शोध घेत असताना पोलीसाना गुप्त खबऱ्याने माहिती दिली की, त्याच्या मित्रांनी त्याचा खून केला असून त्याच्या मृतदेहाची त्यांनी विल्हेवाट लावली आहे या माहिती वरून पोलीसांनी दत्तात्रय याचे मित्र अमोल खामकर आणि सागर सावंत याचा शोध घ्यायला सुरूवात केली होती पण ते ही पोलीसांना मिळून येत नव्हते.पोलीस त्याचा शोध घेत असताना अमोल खामकर आणि सागर सावंत हे दोघे पोलीसांना गुरूवार दि.१२ ऑगस्ट रोजी मिळून आले. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्याचेकडे दत्तात्रय झांबरे याच्याविषयी चौकशी केली असता त्यांनी पोलीसाना चक्रावून टाकणारी घटना सांगितली. दत्तात्रय झांबरे आणि अमोल खामकर सागर सावंत हे तिघेजण जवळचे मित्र होते. दत्तात्रय बरोबर अमोल आणि सागर हे देखील कुपवाड एमआयडीसीमध्ये कारखान्यात कामाला होते. या तिघांना ही दारू पिण्याची सवय होती. त्यासाठी ते दारूची पार्टी करीत होते.दारूच्या नशेत एकमेकांना शिवीगाळ करणे अर्वाच्च शब्दात बोलणे हे त्याच्या मैत्रीत चालत होते. कुणी कोणाचे बोलणे मनावर घेत नव्हते.परंतू सागर आणि अमोल हे दोघे दत्तात्रयला कधी दारूच्या नशेत बोलले तर ते दत्ताच्या जिव्हारी लागत होते.त्याचा रागीट स्वभाव असल्याने त्याला राग लवकर येत होता. दारूच्या नशेत असल्यावर तो ही त्याना त्याच पध्दतीने बोलत होता.त्यामुळे त्याचेत भांडणे ही होत होती. पण ती भांडणे ही तेवढयापुरती असायची परत दुसऱ्या दिवशी नशा उतरली की ते तिघे ही जणू काही सख्खे मित्र असल्यासारखेच वागत होते. ते तिघे ही दारू प्यायला जेवायला एकत्र येत असल्याने त्या तिघांना ही बघून गावातील लोक ही त्याना अट्टल पिंडके म्हणून बोलवत होते. पगारच्या दिवसी त्याची पार्टी ही ठरलेलीच असायची. त्यात ही कधी दारू प्यायला एकत्र आले की त्याचेत पैशाचा हिशोब होत नव्हता. ज्याच्याकडे असतील त्याने पैसे घालयाचे नंतर त्याचेकडून पैसे घ्यायचे असे त्यांचे होत होते. हल्ली लॉकडाऊन असल्याने व परमीट रूम बार बंद असल्याने ते तिघे ही दारू प्यायला ओपन बार म्हणत कुठे रिकामी जागा असेल तेथे जावून बसत होते.दारू पिताना दत्ताला सिगारेट ओढण्याची सवय होती. स्नॅक, ग्लास, दारू आणि सिगारेट घेऊनच ते मैफील जमवत होते. घटनेच्या दिवसी म्हणजे २८ जुलै २०२१ रोजी संध्याकाळच्या सुमारास अमोल आणि सागरला दारू पिण्याची हुक्की उठली बरोबर दत्ताला ही घ्यायचे म्हणून त्या दोघांनी बेत केला. म्हणून ते दोघे ही त्याला बोलवयाला त्याचे घरी गेले. त्यावेळी तो घरी होता.अमोल आणि सागर हे त्याला बोलावयला आलेत म्हटल्यावर तो लगेच घरात कुणाला काही न सांगता त्याच्याबरोबर बाहेर पडला.जाताना त्या तिघांच्या बरोबर त्याचा आणखीन एक मित्र होता. ते चौघे दोन वेगवेगळ्या बाईकवरून दारू पिण्यासाठी म्हणून मिरज-पंढरपूर रस्त्यावरील एका बांधकाम चालू असलेल्या एका रिकाम्या इमारतीत आले. येताना त्या चौघांनी ही बरोबर ग्लास,स्नॅक्स,दारू बरोबर घेतली होती. ते चौघे ही दारू पित असताना त्यांना बऱ्यापैकी नशा ही झाली होती. त्यातच दारू पित असताना दत्ताला सिगारेटची तल्लफ झाली. त्यावेळी बरोबर सिगारेट आणायला ते विसरले होते. हायवेवरील एका पान टपरीवरून सिगारेट आणण्यास दत्ताने अमोल आणि सागर याना सांगितले.त्याना ही दारू पिताना सिगारेट लागत होती. म्हणून ते दोघे सिगारेट आणायला गेले. बराच वेळ झाले तरी ते दोघे सिगारेट घेऊन लवकर येईनात म्हणून दत्ताने त्याना आपल्या मोबाईलवरून त्याच्याशी संपर्क केला. त्यावेळी सागर ने त्यांना सिगारेट हायवेवरील पान टपरीवर नसल्याने गावात आणायला आलो आहे असे सांगितले. इकडे दत्ताची सगळी दारू संपलेली होती. त्याला परत दारू पाहिजे होती. म्हणून त्याने त्या दोघांना येताना आणखीन एक क्वार्टर आणायला सांगितली. परंतू त्या दोघांच्याकडे ही क्वार्टरसाठी पैसे नसल्याने ते दोघे ही सिगारेटचे पाकीट तेवढे घेऊन आले. त्यावेळी दारू न मिळाल्याने दत्ताचा रागाचा पारा चढला होता. त्याला नशा ही जास्तच झाली होती.त्या नशेत तो त्या दोघांना तुम्ही सिगारेट आणायला गेला होता की दुसरीकडे दारू प्यायला गेला होता म्हणत त्याना सिगारेट आणायला एवढा वेळ लागतो का? तुम्हाला उशिर का झाला असे म्हणत त्या दोघांना ही तो अर्वाच्च भाषेत शिव्या देवू लागला.तो शिव्या देत असताना ते दोघे ही दत्या उगाच काही तरी बडबडू नकोस. आम्ही सिगारेट आणायला गेलो होतो. दारूसाठी आमच्याकडे पैसे शिल्लक नसल्याने आम्ही फक्त तुझ्यासाठी सिगारेट आणली आहे म्हणत ते ही त्याला अर्वाच्च शब्दात शिव्या देवू लागले. बघता, बघाता त्या तिघांत वाद वाढला ते तिघे ही एकमेकांच्या अगांवर जात होते. दत्ताला तर कशाचे भान नव्हते. तो त्याना नको नको ते बोलत होता. दत्ता मारायला अंगावर येत असताना अमोल आणि सागर ही गप्प बसणाऱ्यातील नव्हते. ते ही त्याला मारहाण करू लागले होते. दारूच्या पार्टीचा रंगाचा बेरंग झाला होता. ग्लास, स्नॅक्स सगळे काही विस्कटले होते.कुणाचा कुणाला ताळमेळ लागत नव्हता. त्याचे पैकी चौथा त्याचा मित्र त्याचे भांडण सोडवायचा प्रयत्न करीत होता. पण तिघे ही त्याला ऐकत नव्हते. त्यांनी त्याला बाहेर काढले. आता ते तिघे ही एकमेकांच्या अगांवर धावून जात होते. दत्ताला राग सहन होत नव्हता. तो त्या दोघांच्यावर तावा तावाने जात होता. म्हणून त्या दोघांनी ही त्याला खाली पाडून लाथा बुक्कांनी मारहाण केली त्यातच अमोलकडे गाडीच्या डिकीत कोयता होता. तो ते घेऊन आला आणि त्याने त्या कोयत्याने दत्तावर सपासप वार केले. त्याच्या पायावर हातावर डोक्यावर त्याने कोयत्याने वार केल्याने दत्ताच्या शरीरातून रक्ताच्या धारा वाहत होत्या. तरी ही त्याचे मन काही काही शांत झाले नाही म्हणून त्यांनी जवळच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि त्याच्या डोक्यात जोरात हाणला. त्यासरशी दत्ता रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडला. त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे लक्षात येताच अमोल आणि सागर हे भानावर आले. त्यांनी आता त्याच परिस्थिती दारूच्या नशेत त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची हे ठरविले. त्यासाठी त्यांनी शांत डोक्याने विचार करीत मयत दत्ताच्या मृत शरीराचे त्याच कोयत्याने बारीक बारीक तुकडे तुकडे केले. ते तुकडे त्यांनी घटनास्थळावरून नेऊन जवळच असलेल्या एका कुपनिलीकेत टाकून दिले. त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यानंतर ते दोघे ही घटनास्थळावरून पसार होऊन बाहेर गावी गेले.

इकडे दत्ता बेपत्ता असल्याची तक्रार मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनला त्याच्या नातेवाईकांनी दिल्याने पोलीस त्याचा शोध घेत असताना घटनेच्या दिवशी तो अमोल खामकर आणि सागर सावंत याचेबरोबर असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. संशयावरून पोलीस त्याचा शोध घेत असताना १२ ऑगस्ट रोजी ते दोघे ही पोलीसांना मिळून आले होते. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता सुरूवातीला ते पोलीसाना या घटनेशी आपला काहीच संबंध नाही असे सांगत होते. परंतू पोलीसांनी त्या दोघाना आपला पोलीसी खाक्या दाखविताच ते पोपटासारखे बोलू लागले. त्यांनी आपल्या गुन्हयाची कबुली देऊन तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. त्यांनी त्याच्या मृतदेहाचे बारीक बारीक तुकडे करून कुपनलिकेत टाकले असल्याची माहिती पोलीसाना दिल्यावर पोलिसांनी त्या कुपनिलकेतून मयत दत्ताच्या शरीराचे बारीक बारीक केलेले तुकडे काढण्याचा प्रयत्न केला. ती कुपनिलका ही सुमारे ३०० फूट खोल असल्याने ते तुकडे काढण्यासाठी पोलीसांना बरेच प्रयत्न करावे लागले. मयत दत्तात्रय झांबरे याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून दत्तात्रय झांबरे (वय २८) रा.भोसे ता.मिरज याचा खून करून पुरावा नष्ट केले प्रकरणी त्याचे मित्र अमोल खामकर (वय २५) आणि सागर सावंत(वय २३) या दोघांच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मिरज येथील प्रथमवर्ग न्यायायलासमोर हजर केले असता मा.न्यायालयाने त्या दोघांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली बाईक आणि कोयता जप्त केला होता. या घटनेचा पुढील तपास मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत. दारूची नशा ही करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते तरी ही दारुच्या व्यसनाच्या आहारी अनेकजण जात असतात. दारूच्या नशेत कधी कोणती अघटित अशी घटना घडेल हे काही सांगता येत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

## वादामुळे संसारात काहीच नाही उरले...

त्याच्या पत्नीने १६ जूनला कुर्ल्यातील विनोबा भावे पोलीस ठाण्यात केली. दीपक सांगळे याची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती. त्याने अनेक गुन्हे केले होते. त्यापैकी ४ गुन्हे हे विनोबा भावे पोलीस ठाण्यात आधीपासूनच दाखल होते. त्यामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमीवर कुणी दीपकचं अपहरण किंवा हत्या तर केली नाही ना? असा संशय पोलिसांना होता. पोलिसांनी अनेक बाजूंनी विचार करुन तपास केला. विनोबा भावे पोलीस ठाण्याच्या पोलिसांसोबतच या प्रकरणाचा समांतर तपास गुन्हे शाखेचं पथकही करत होतं. गुन्हे शाखेच्या पथकाला या प्रकरणाचा तपास करत असताना दीपक सांगळे कुठेच सापडला नाही. त्यामुळे पोलिसांना त्याच्या पत्नीवर संशय आला. गुन्हे शाखेने पत्नीला चौकशीसाठी बोलावलं. यावेळी चौकशीदरम्यान पत्नीने आपण पतीची हत्या केल्याची कबुली दिली. मृतक दीपक सांगळे हा आपल्या पत्नीसह कुर्ल्याच्या क्रांतीनगर परिसरात वास्तव्यास होता. त्याचा पत्नीसोबत सारखा वाद व्हायचा. अशाचप्रकारच्या एका वादातून रागत पत्नीने त्याची हत्या करण्याचा निर्णय घेतला. पत्नीने जेवणात विष मिसळून पतीची हत्या केली. मृतक पती आपल्याला वारंवार त्रास देत असल्याने आपण हे पाऊल उचलल्याचं आरोपी पत्नीने सांगितल. या कृत्यात तिला काही नातेवाईकांनी देखील साथ दिली. आरोपी सरस्वती दीपक सांगळे हिने दिलेल्या कबुलीजाबाबानंतर गुन्हे शाखेने तिच्यासह सातजणांना बेड्या ठोकल्या. तसेच न्यायालयाच्या परवानगीनंतर मृतदेह बाहेर काढण्यात येणार आहे. आपल्या पतीची हत्या करून त्याचा मृतदेह घरातच पुराणाऱ्या क्रूरकर्मा पत्नीला मुंबईच्या विनोबा भावे पोलिसांनी सरस्वती दीपक सांगळे (२१), मनीषा प्रशांत आचारी (२५), आदीत मस्तराम गौतम (१९), आनंद मस्तराम गौतम (२२), विशाल राजू करांडे (२५), किशोर प्रमोद साहू (२४) आणि रितीक प्रेमसिंह विश्वकर्मा (२२) यांना अटक केली आहे. या महिलेने व तिच्या साथीदारांनी सदर व्यक्तीची हत्या करून त्याचा मृतदेह १८ जून रोजी घरातच पुरण्याचा निर्दयी आणि क्रूर प्रकार केला होता. १८ जून रोजी पुरलेला मृतदेह आज सकाळी फॉरेन्सिक डॉक्टरांच्या मदतीने पोलिसांनी बाहेर काढला आहे. मृत दिपक सांगळे हा १८ जून पासून बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पोलीस ठाण्यात दिली होती. तर, दिपक याची पार्श्वभूमी ही गुन्हेगारी प्रवृत्तीची होती. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल होते, त्यामुळे तपासाला दिशा मिळत नव्हती. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात दीपक हरवला नसून त्याची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले. दिपकची हत्या त्याचाच पत्नीने केल्याचे तपासात उघड झाले आहे. खळबळजनक बाब म्हणजे पतीला जेवणातून बेशुद्ध होण्याचे औषध दिले आणि त्यानंतर त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करत त्याची हत्या केली. हत्या केल्यानंतर दिपकचा मृतदेह घरातच पुरून दीपक हरवला असल्याचे नाटक रचण्यात आले. मात्र, पोलिसांनी हे नाट्य उधळून लावत हत्येचा छडा लावत ७ आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरु आहे.

पान ८ वरून....

## सोलापूरमधील कोंडी येथे चहा ...

यांनी धाड टाकून मे. केजीटी कंपनीची तपासणी केली असता तपासणीवेळी चहा पावडर मध्ये रंग वापरत असल्याचे आढळून आले. यावेळी चहा पावडरचा सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचा २ हजार २३० किलोचा साठा जप्त करून त्यातील नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून देण्यात आले आहे. याचा अहवाल आल्यानंतर अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमाने २०११ कायद्यानुसार कंपनीच्या संचालकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## भोपणी येथे रिसोर्स फार्मर शिवार ...

हंगामातील सर्व पिकावरील रोग नियंत्रण कीटक नियंत्रण तसेच हळद तूर मूग उडीद सोयाबीन इत्यादी पिकांची मध्ये पडणाऱ्या बुरशी या पिकावर ती मार्गदर्शन करत असताना शेतकऱ्यांनी बीबीएफ आणि टोकण पद्धतीच्या सोयाबीन तंत्रज्ञान लागवडीचे रहस्य आणि त्या माध्यमातून विक्रमी उत्पादनाची यशोगाथा शेतकऱ्यांना सांगितली. मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे मुख्य शास्त्रज्ञ श्री. सचिन डिग्रसे यांनी देवणी तालुका हा सतत अनोखे उपक्रम राबवणे मध्ये यशस्वी आहे. असाच नवनवीन पॅटर्न मधील उपक्रम राबवून जिल्ह्याचे नाव राज्याच्या नकाशावर ती आणावे अशा शुभेच्छा दिल्या. लातूरचे उपविभागीय कृषी अधिकारी आर. एस.कदम यांना शेतकऱ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. माननीय कदम सर हे देवणी तालुक्याचे सहा वर्ष तालुका कृषी अधिकारी या पदावर अतिशय जबरदस्त प्रभावी पणे काम करून शेतकऱ्यांची अनेक विषयांमध्ये प्रगती करून दाखवली होती यावेळी परिसरातील शेतकऱ्यांनी माननीय कदम साहेबांना जुन्या आठवणींना उजाळा देत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कुषावर्ता बेळे यांनी तालुक्यातील सर्व कृषी कर्मचाऱ्यांची शाबासकी देत शेतकऱ्यांचे मेळावे होतात त्यामध्ये स्त्रियांची संख्या ही अतिशय कमी असते. स्त्रिया ह्या शेतकऱ्यांना खांद्याला खांदा देऊन अतिशय काबाडकष्ट करतात त्यामुळे त्यांना कृषी विभागाच्या सर्वच कार्यक्रमांमध्ये उपक्रमांमध्ये स्त्रियांचा सुद्धा सहभाग वाढवावा अशी सूचना केली. नेकनाळ येथील राजपाल बिरादार यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय पशुपालन याबाबत अतिशय शास्त्रशुद्ध माहिती दिली. गोंडगाव येथील पुरस्कार प्राप्त शेतकरी राजकूमार धोंडीराम बिरादार यांनी सेंद्रिय शेती आणि सेंद्रिय शेतीची मार्केटिंग याबाबत माहिती दिली पुरस्कार प्राप्त ओमकार मस्कले यांनी शेततळ्यातील मत्स्यपालन आणि सेंद्रिय निविष्ठा निर्मिती याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. शिरीष कुमार घणभादुर यांनी शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या अनेक योजना बाबत अवगत करून शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावेळी सकाळ अग्रोवन मार्टच्या प्रतिनिधींनी शेतकऱ्यांना सकाळ ॲग्रो मार्टच्या नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. टोकण पद्धतीने बी लागवडीचे तंत्रज्ञान व फवारणी किटची माहिती शेतकऱ्यांना या वेळी देण्यात आली. रिसोर्स फार्मर शिवारफेरी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी केदासे यांनी करत असताना या कार्यक्रमाची मुख्य संकल्पना अशी आहे की सर्व कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी आणि तालुक्यातील सर्व यशस्वी प्रगतशील शेतकरी यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शिवार फेरी आयोजित करणे आणि सर्वामध्ये चर्चासत्र घडवून आणणे या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न बांधावरच सोडवले जातील जेणेकरून शेतकऱ्यांमध्ये उत्पन्न आणि उत्पादन या दोन्ही गोष्टी वाढून आर्थिक सुबत्ता येईल. या कार्यक्रमास मधुकर रावजी लांडगे, भोसले मामा बोंबळीकर, अंकुश बागवाले, शीतल पाटील, पांडुरंग चामले, विजयकुमार लुल्ले, सुरेश चिंचोळे, राजकुमार बिरादार, गजानन लांडगे, प्रभुराव इंगोले, दौडमिया उंटवाले यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राहुल जाधव यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे अधिकारी कर्मचारी यांचे प्रगतिशील शेतकऱ्यांचे आभार प्रदर्शन केले. गोविंदरावजी भोपणीकर साहेब यांनी शेतामध्ये बांधावर या कार्यक्रमाचे आयोजन करून जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील तज्ञ-शास्त्रज्ञ व अधिकारी यांना एकत्र घेऊन अतिशय उत्कृष्ट अशा कार्यक्रमाचे आयोजन करून शेतकऱ्यांना शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमामुळे देवणी तालुक्यातील कृषी क्षेत्राचा कायापालट निश्चित होईल अशी प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी बोलताना यावेळी दिली.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे इमारत ...

उभारताना बनावट कागदपत्रे सादर केल्याने सदरची गुरुदेव निवास इमारती जमीनदोस्त करावी म्हणून पालिकेला निर्देश दिले. मात्र या विरोधात आरोपींनी न्यायालयात धाव घेतली. अखेर २७ जून २०१९ रोजी शांतीनगर पोलिस ठाण्यात तिन्ही आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला. यामुळे आरोपींनी अंतरिम जामीनसाठी अर्ज केला. मात्र ८ ऑगस्ट २०१९ रोजी जिल्हा सत्र न्यायालय ठाणे यांनी आरोपीचा अंतरिम जामीन रद्द केला होता. तरी देखील या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यासाठी तक्रादार इद्रिस यांनी वारंवार वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडे तक्रार दिल्या होत्या. अखेर दीड वर्षांनी या गुन्ह्यातील २ आरोपीना शांतीनगर पोलिसांनी अटक केली आहे. तर मुख्य आरोपी भरत सूचक हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

क्राईम संध्या | सोमवार दि. ०६ सप्टेंबर २०२१ ते रविवार दि. १२ सप्टेंबर २०२१ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# हातभट्टी दारुमुक्तीसाठी सोलापूर ग्रामीण पोलिसांचे 'ऑपरेशन परिवर्तन' मोहीम!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील हातभट्टी दारू व्यवसाय समूळ नष्ट करून या व्यवसायात गुंतलेल्या प्रत्येकाला सन्मानजनक व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्यात येऊन गाव व तांडा शंभर टक्के अवैध दारूमुक्त करण्यासाठी 'ऑपरेशन परिवर्तन' ही संकल्पना सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सोलापूर जिल्ह्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी विडा उचलला आहे. त्यासाठी त्यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकारी यांच्याशी संवाद साधला आहे. पोलीस अधीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक हे या परिवर्तनाच्या चळवळीसाठी झटणार आहेत. स्वतः पोलीस अधीक्षक यांनी ही एक गाव दत्तक घेतले आहे. दारूचा महापूर निघतो अशी या गावाची ख्याती आहे. त्या मुळेगाव तांड्याचा कायापालट करण्याचा विडा पोलीस अधीक्षक सातपुते यांनी उचलला आहे. तर अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी भानुदास तांडा आणि पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील यांच्याकडे बक्षीहिप्परगा या गावाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तिऱ्हे तांडा स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्याकडे, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांच्याकडे कोंडी तांडा, पोलीस उपनिरीक्षक नारायण भोसले यांच्याकडे वडजी तांडा



दारूमुक्त करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. माळकवठे बस स्थानक परिसरातील हातभट्टी दारूमुक्त करण्यासाठी मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे तर स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे यांच्याकडे मंद्रुप परिसरातील वडापूर गाव सोपविण्यात आली आहे. मंद्रुप परिसरातील नऊ गावांचा समावेश आहे. मंगळवेढा तालुक्यातील मानेवाडी पोलीस निरीक्षक ज्योतिराम गुंजवटे यांच्याकडे, सांगोला तालुक्यातील महूद गाव सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्याकडे, कामती पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेगमपूर गाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर यांच्याकडे, धोत्री गाव वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्याकडे, अक्कलकोट शहराची उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्याकडे, अक्कलकोट तालुक्यातील तडवळ गाव उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड यांच्याकडे, कल्लकर्जाळ गाव दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप काळे यांच्याकडे तर करजगी व अक्कलकोट स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. त्याचबरोबर अक्कलकोट उपविभाग, बार्शी उपविभाग, अकलूज उपविभाग, मंगळवेढा उपविभाग, पंढरपूर उपविभाग आणि करमाळा उपविभागातील गाव व तांडा या संकल्पनेतून कायमस्वरूपी दारूमुक्त होणार आहेत. पोलीस अधिकाऱ्यांना त्यांची नियमित कामे करून ही संकल्पना राबविण्यासाठी झटावे लागणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील दारूमुक्त गावाची संकल्पना नक्कीच महाराष्ट्र राज्यात रोल मॉडेल ठरेल. या उपक्रमाला जिल्ह्यातील महिलांचा ही नक्कीच पाठबळ राहणार आहे. असा विश्वास पोलीस अधिकाऱ्यांनी ही व्यक्त केला आहे. गाव तसेच तांडा येथील अवैध दारू निर्मिती तसेच विक्रीच्या ठिकाणी पोलिसांकडून होते. कारवाई दरम्यान मिळून आलेल्या लोकांवर कायदेशीर कारवाई होणार, त्यानंतर त्यांना या अवैध धंद्यांतून बाहेर काढण्यासाठी त्या त्या अधिकाऱ्यांमार्फत गाव, तांडा तसेच पोलीस ठाण्यामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. त्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर विविध व्यवसायाची माहिती देऊन त्यांना त्यामध्ये करियर करण्यासाठी मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून करण्यात येणार आहे अशी माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सांगितले.

# शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे गणेशोत्सव आनंदाने साजरा करावा -महापौर प्रतिभा पाटील



**भिवंडी/अभिजित हिरे**

कोरोनाचा पार्श्वभूमीवर आपण सर्वजण गणेशोत्सव साजरा करीत आहोत. अजूनही कोरोना पूर्णपणे गेलेला नाही याचे भान देखील बाळगणे आवश्यक आहे. तसेच वेगवेगळ्या तज्ञांकडून कोरोनाचा तिसरा लाटेचे शक्यता वर्तवण्यात येत आहे. या सर्व गोष्टी विचारात घेऊन राज्य शासनाने गणेशोत्सव संदर्भात मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. या शासनाच्या मार्गदर्शक सूचना सर्वांना आवश्यक असून या सूचनांप्रमाणे सार्वजनिक गणेशोत्सव सगळ्याने शहरात आनंदाने साजरा करावा, असे आवाहन महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी केले. सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणे बाबत माननीय महापौर प्रतिभा विलास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक महापालिकेत घेण्यात आली त्यावेळी महापौर प्रतिभा विलास पाटील बोलत होत्या. यावेळी पालिका आयुक्त सुधाकर देशमुख, उपमहापौर इम्रान वली मोहम्मद खान, भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ दोनचे योगेश चव्हाण, स्थायी समिती सभापती संजय म्हात्रे, अतिरिक्त आयुक्त प्रकाश दिवटे, भाजपचे गटनेते हनुमान चौधरी कोणार्क विकास आघाडीचे गटनेते विलास पाटील नगरसेवक हलीम अन्सारी, सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई व अन्य पदाधिकारी यांचे बरोबरच तसेच पालिकेचे अधिकारी, टोरंट पॉवरचे, पोलिस विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महापौर प्रतिभा पाटील पुढे म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम न करता आरोग्यविषयक उपक्रम उदाहरणार्थ रक्तदान, आरोग्य तपासणी इत्यादी उपक्रम आयोजित करण्यात यावेत. साथीचे आजार जसे मलेरिया, डेंग्यू इतर साथीचे आजार व त्यावर करण्यात येणारे उपाय यासंबंधीची माहिती देण्यात यावी. कोरोनाबाबत जनजागृती करण्यात यावी. गणेशोत्सव हा आरोग्य उत्सव म्हणून साजरा करावा असे आवाहन देखील महापौर प्रतिभा विलास पाटील यांनी केले. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने गणेश दर्शनाची सोय ऑनलाइन पद्धतीने, केबल, नेटवर्क, फेसबूक इत्यादीद्वारे करून देण्यात यावी जेणेकरून त्या ठिकाणी गर्दी होणार नाही. गणेशोत्सवाच्या काळात सर्वत्र साफसफाई राहिल स्वच्छता ठेवण्यात यावी, जंतुनाशक औषध फवारणी करावी, शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, सर्व प्रमुख रस्त्यांवर डागडुजी करून खड्डे बुजवण्यात यावेत, रस्ते दुरुस्त करण्यात यावेत. सर्व विसर्जन घाटांवर योग्य त्या सर्व अत्यावश्यक सुविधा पुरविण्यात याव्यात असे आदेश देखील महापौर प्रतिभा पाटील यांनी प्रशासनास दिले आहेत. यावेळी आयुक्त सुधाकर देशमुख यांनी देखील सांगितले की महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यानुसार विसर्जनाच्या दिवशी सर्व प्रकारे चांगल्या प्रकारे व्यवस्था महापालिका करेल. तसेच पोलिस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी सांगितले की, सर्व गणेशोत्सव मंडळ व गणेशभक्त यांनी जर शासनाने दिलेल्या नियमांचे पालन केले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नच निर्माण होणार नाही आपण सर्व कायदा व सुव्यवस्था राखण्याचे प्रयत्न करूया. महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई यांनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ काळात येणाऱ्या अडचणी पालिका व पोलीस प्रशासनासमोर मांडल्या.

# देवणी नगर पंचायतीचे प्रशासकीय अधिकारी ताराळकर यांची बदली



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी नगर पंचायतचे प्रशासकीय अधिकारी प्रभाकर शंभोदेव ताराळकर यांची नुकतीच नगर परीषद कार्यालय जिंतुर जिल्हा परभणी येथे बदली झाल्याने गुरुवारी सकाळी आकरा वाजता देवणी नगर पंचायत कार्यालयात निरोप समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी नगर पंचायत तर्फे ताराळकर यांचा भव्य सत्कार करुन निरोप देण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष वैजनाथ अष्टुरे, प्रशासकीय अधिकारी श्रीपाद कुलकर्णी, माजी सरपंच राजकुमार बंडगर, प्रकाश शिंदे, अमित संभाळे, पत्रकार शकिल मनियार, नगर पंचायत कर्मचारी अमोल शिंदे, बापुराव बडोरे, देवीदास सुर्यवंशी, नामदेव टाळकोटे, संतोष जिवणे, मुस्तपा पठाण, रेड्डी आदीजण उपस्थित होते.

# भरधाव ट्रकच्या धडकेत चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू

**वाडा/प्रतिनिधी**

वाड्यातील सागर पेट्रोल पंप समोर ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने एका दोन वर्षीय चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला असून या घटनेतील ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कविता अविनाश घाटाळ व शर्मिला सुरेश पडोसे हे दोन्ही दाम्पत्य आपल्या दोन लहान मुलांसोबत सापाने येथे पाहुणे आले होते तेथून ते भिवंडी तालुक्यातील चिंबीपाडा व दाभाड येथे जाण्यास निघाले असता वाड्यातील सागर पेट्रोलपंप समोर मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने (एम.एच.०४ एफ.डी.८७००) त्यांच्या दुचाकीला मागून धडक दिली. या भीषण अपघात आरुष घाटाळ (वय २ वर्षे) हा चिमुकला जागीच ठार झाला असून त्याच्या आईवडिलांना हाता पायाला जखमा झाल्याने त्यांना वाडा ग्रामीण रुग्णालयत दाखल करण्यात आले आहे. अपघाताच्या या घटनेने खळबळ माजली असून फरार झालेल्या ट्रक चालक गणेश यादव याला शिरीषपाडा येथे नागरिकांनी अडवून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. दरम्यान उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू होती.




## पो.नि.कामठेवाड व सोंडारे यांचा सत्कार

**देवणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांची लातुर येथे बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यात आले असुन त्यांच्या जागी जळकोट येथुन आलेले पोलीस निरीक्षक गणेश सांडोरे यांचे स्वागत करण्यात आले यावेळी साहयक पो.नि.शिनगारे, पोलीस उपनिरीक्षक रंजीत काथवटे, पो हे का विनायक कांबळे, पोलिस सिपाई किवंडे यांच्यासह पोलीस कर्मचारी, शहर व तालुक्यातील लोकप्रतीनिधी, नागरिक, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.**

# महा आवास अभियान-ग्रामीण पारितोषिक वितरण; अभियानादरम्यान उत्कृष्ट काम केल्याबद्दल सर्वात जास्त पारितोषिके पालघर जिल्ह्याला

# विकास योजना राबवितांना कोकण विभाग राज्यात अग्रेसर -विलास पाटील

## जिल्हा परिषद अध्यक्षा वैदेही वाढाण, मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी केला सत्कार

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विकास योजना राबवितांना सुसंवादाचे वातावरण ठेवले तर मोठे कार्य उभे राहते. म्हणूनच कोकण विभाग शासकीय विकास योजना राबवितांना राज्यात सर्व क्षेत्रात अग्रेसर असतो. असे प्रतिपादन कोकण विभागाचे महसूल आयुक्त विलास पाटील यांनी केले. महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची यशस्वी अंमलबजावणी व कामगिरीबाबत जिल्हा परिषद अध्यक्षा वैदेही वाढाण, मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी सत्कार केला. मुल्यमापन करुन उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना आज कोकण भवन येथे महा आवास अभियान-ग्रामीण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळयाच्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास श्रीम.पुष्पाताई पाटील मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद ठाणे,श्रीम. वैदही विशाल वाढाण मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर, श्रीम. योगिता पारधीमा अध्यक्ष, जिल्हा परिषद रायगड,श्रीम. संजना सावंत मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, भाऊसाहेब दांडगे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे, श्री.सिद्धराम सालीमठ मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पालघर, श्री.डॉ.किरण पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड, श्रीम.डॉ.इंदुराणी जाखड मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रत्नागिरी, प्रजित नायर मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सिंधुदुर्ग, श्री.गिरीश भालेराव उप आयुक्त (विकास), श्री. मनोज रानडे उप आयुक्त (सामान्य), श्री. मकरंद देशमुख उप



आयुक्त (महसुल), डी. वाय.जाधव उप आयुक्त (आस्थापना), चंद्रकांत वाघमारे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पालघर, श्री.रणधीर सोमवंशी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रायगड/प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, रायगड श्री.दादाभाऊ गुंजाळ प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, ठाणे, श्री.माणिक दिवे प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, पालघर, श्रीम.नंदिनी घाणेकर प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, रत्नागिरी राजेंद्र पराडकर प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यंत्रणा, सिंधुदुर्ग आदि मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करतांना आयुक्त विलास पाटील पुढे म्हणाले की, कोकण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सकारात्मक ऊर्जा ठेवून यापुर्वीही काम केले आहे. अशीच ऊर्जा पुढेही ठेवावी. कोकण विभाग नेहमीच शासकीय योजना राबविण्याबाबत आघाडीवर असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोकणातील आदर्श व सुंदर गावे आहेत. कोकणाला नेहमीच स्वच्छतेची आवड आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे कौतुक करतांना आयुक्त म्हणाले की, विकास कामे करतांना जिल्हा परिषद, पंचायत समिती व महसूल विभागातील पदाधिकाऱ्यांना मोठया आवाहनाला सामोरे जावे लागते. लोकप्रतिनिधींनी सर्व पक्षभेद, जातीपाती विसरुन एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. आगामी गणेशोत्सवाचा उत्सव लक्षात ठेवून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सगळयांनी जागरुक राहून शासनाचे नियम पाळणे आवश्यक आहेत. लोकप्रतिनिधींनी तळागाळापर्यंत कोरोनाबाबत जनजागृती करावी. अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. सन २०२०-२१ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दि.२० नोव्हेंबर, २०२० ते ५ जुन, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान ग्रामीण राबविण्यात आले. अभियानात प्रधानमंत्री आवास योतजनेसाठी ठाणे जिल्हयाने प्रथम क्रमांक पटकावला असून संपूर्ण अभियानादरम्यान उत्कृष्ट काम केल्याबद्दल सर्वात जास्त पारितोषिके पालघर जिल्हयाला मिळालेली आहेत.

पारितोषिक प्राप्त संस्था पुढीलप्रमाणे : प्रधानमंत्री आवास योजना- सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद प्रथम क्रमांक-जिल्हा परिषद ठाणे, द्वितीय क्रमांक-जिल्हा परिषद रत्नागिरी, तृतीय क्रमांक-जिल्हा परिषद रायगड. राज्य पुरस्कृत आवास योजना- सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद प्रथम क्रमांक-जिल्हा परिषद रत्नागिरी, द्वितीय क्रमांक-जिल्हा परिषद सिंधुदूर्ग, तृतीय क्रमांक-जिल्हा परिषद ठाणे. सर्वोत्कृष्ट पंचायत समिती प्रथम क्रमांक-पंचायत समिती म्हसळा जि.प.रायगड, द्वितीय क्रमांक-पंचायत समिती दापोली, जि.प.रत्नागिरी, तृतीय क्रमांक-पंचायत समिती कुडाळ, जि.प.सिंधुदुर्ग, राज्य पुरस्कृत आवास योजना- सर्वोत्कृष्ट पंचायत समिती प्रथम क्रमांक-पंचायत समिती मोखाडा जि.प.पालघर, द्वितीय क्रमांक-पंचायत समिती तलासरी, जि.प.पालघर, तृतीय क्रमांक-पंचायत समिती वैभववाडी, जि.प.सिंधुदुर्ग, प्रधानमंत्री आवास योजना- सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत-प्रथम क्रमांक-ग्रामपंचायत वाडोस, ता.कुडाळ, जि.प.सिंधुदुर्ग, द्वितीय क्रमांक-ग्रामपंचायत आखवणे भोम, ता.वैभववाडी, जि.प.सिंधुदुर्ग, तृतीय क्रमांक- ग्रामपंचायत सडुरे शिराळे, ता.वैभववाडी, जि.प.सिंधुदुर्ग. राज्य पुरस्कृत आवास योजना- सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत-प्रथम क्रमांक-ग्रामपंचायत अणाव, ता.कुडाळ, जि.प.सिंधुदुर्ग, द्वितीय क्रमांक-ग्रामपंचायत मांगवली, ता.वैभववाडी, जि.प.सिंधुदुर्ग, तृतीय क्रमांक- ग्रामपंचायत उमरोली, ता.पालघर, जि.प.पालघर. धानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत आवास योजना - सर्वोत्कृष्ट वित्तीय संस्था प्रथम क्रमांक- उमेद- ता. जव्हार, जि.पालघर द्वितीय क्रमांक- उमेद- ता.वाडा, जि.पालघर तृतीय क्रमांक- उमेद- ता. डहाणू, जि.पालघर.

प्रधानमंत्री आवास योजना-शासकिय जागा उपलब्धता- प्रथम क्रमांक-तहसिलदार, ता.कल्याण,जि.ठाणे द्वितीय क्रमांक- तहसिलदार, ता.शहापूर, जि.ठाणे तृतीय क्रमांक-निरंक, कोकण विभागातील सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत व सर्वोत्कृष्ट गृहसंकुल पुढीलप्रमाणे आहेत.प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत-प्रथम क्रमांक-ग्रामपंचायत चिंचवली, ता.भिवंडी, जि.प.ठाणे. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण सर्वोत्कृष्ट गृहसंकुल प्रथम क्रमांक- श्रीम.सखुबाई दाजीबा निकम, ग्रा.पं. मुणगे, ता.देवगड, जि.प.सिंधुदुर्ग यांना देण्यात येणार आहेत. अभियानातील कार्पोरेट संस्थासाठी देण्यात येणारा सर्व उत्कृष्ट जिल्हा पालघर रोटरी डिस्ट्रीक्ट ३१४१ अशियाना ता.वाडा जि.पालघर यांना घोषित करण्यात येणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळयास पंचायत समितीचे सभापती व गटविकास अधिकारी, तसेच ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी तसेच पुरस्कार प्राप्त वित्तीय संस्था आणि जागा उपलब्धतासाठी तहसिलदार व गटविकास अधिकारी उपस्थित होते. कोरोना नियम पाळून पारितोषिक वितरण कार्यक्रम करण्यात आला.

# जिल्ह्यातून ९५% आणि ८५९ गावातून कोरोना विषाणू हद्दपार झाल्याचे समाधान –निलम गोऱ्हे



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातून कोरोना पूर्ण पणे नष्ट झाला नसला तरी जिल्ह्यातुन ९५% आणि ८५९ गावांतून कोरोना हद्दपार झाला असल्याबद्दल समाधान वाटते, असे मत विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले. कोरोना मुक्त झालेल्या ग्रामपंचायतीचे अनुभव ऐकण्यासाठी तसेच कामगार विभाग, परिवहन विभाग, आदिवासी विभाग, रोजगार हमी योजना, प्रादेशिक परिवहन विभाग आदि विभागांनी जनतेसाठी थेट मदत जाहीर केली होती ती कितपत पोहोचली आहे, त्यात काही त्रुटी आहेत का याच्या बद्दलचा आढावा घेण्यासाठी नीलम गोऱ्हे पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्या होत्या. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे आढावा सभा आयोजित केली होती त्यावेळी त्या बोलत होत्या. कोरोना मुक्त झालेल्या २४ ग्रामपंचायतीच्या सरपंचांकडून त्यांनी आपल्या गावाबद्दलच्या यशोगाथा जाणून घेतल्या.कोरोना काळात काय उपाययोजना केल्या, कशाप्रकारे जनजागृती केली, अडचणींवर कशा प्रकारे मात केली,लसीकरण किती प्रमाणात झाले आहे इत्यांदी बद्दल सविस्तर माहिती घेतली. तसेच महिला व बाल विकास विभागा मार्फत स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्स मधून कोरोना काळात वैधव्य आलेल्या महिलांसाठी उपसमिती स्थापन करावी, तसेच विधवा महिलांचे मालमत्ता विषयक अधिकार अबाधित राहावे कोरोना च्या दुष्परिणाम यामुळे बालविवाह बालमजुरी यांसारख्या समस्या उद्भवू नयेत यासाठी दक्षता समिती स्थापन करावी ज्यात कुठल्याही पक्षाच्या महिलांचा समावेश असल्यास हरकत नाही अशा प्रकारच्या सूचना यावेळेस उपसभापती विधान परिषद नीलम गोऱ्हे यांनी दिल्या. यावेळी गोऱ्हे यांनी ९विभागांचा आढावा घेतला. आरोग्य विभागाकडून कोव्हीड बद्दलचा आजची पालघर जिल्ह्यातील स्थिती काय आहे याबद्दल संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. रोजगार हमी योजनेचे कामात गेल्या वर्षभरात जिल्ह्यात ६० कोटी ५० लाख रुपये मजुरी देण्यात आल्याची माहिती तसेच कामगारांची थकीत वेतन राहिले होते ते आस्थापना विभागाकडून १८ कोटी रुपये मिळाले आहेत. विविध घटकांना एकूण २७ कोटी रुपये राज्य सरकारकडून लाभधारकांना डीबीटीच्या माध्यमातून थेट मदत करण्यात आली आहे १४ हजार ५२३ रिक्षाचालकांना एक कोटी ११ लाख रुपयांची डीबीटीच्या माध्यमातून मदत केली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील महिलांना सातत्याने कृषीविषयक मदत कशी देता येईल याचा आराखडा तयार करण्याचेही यावेळी सांगण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा वैदही वाढाण, माविमच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, खासदार राजेंद्र गावित, आमदार रवींद्र फाटक, नगराध्यक्ष उज्वला काळे, जिल्हाधिकारी डॉ माणिक गुरसळ, मुख्य अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिद्धराम सालिमठ, पोलीस अधीक्षक दत्तात्रेय शिंदे, किरण महाजन आदी उपस्थित होते.

# उदगीरमध्ये रस्त्यातील खड्ड्यात झाड लावून मनसेने केले पूजन!



**देवणी/प्रतिनिधी**

उदगी नांदेड बिदर महामार्गावरील नांदेड नाका तसेच उदय पेट्रोल पंपा समोर खड्ड्यामध्ये रोज १० ते २० मोटर सायकल स्वाराचा अपघात होत आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने या खड्ड्यांमध्ये पाणी भरत असल्याने तसेच रस्त्याच्या मधोमध खड्डे आल्याने त्यांचा खोलीचा तसेच खड्डे असण्याचा अंदाज येत नसल्याने भरधाव वेगाने येणारे मोटरसायकलस्वार यात अआदळुन पडत आहेत या अपघातामुळे नागरिकांना शारीरिक मानसिक आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या खड्ड्यात बेशरमाची झाडे लावून तसेच त्यांना फुले वाहून नारळ फोडून मनसेने निषेधात्मक आंदोलन केले आहे तरी या उपरही सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येऊन तात्काळ खड्ड्यांची दुरुस्ती नाही झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना उदगीर शहर शाखा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी अशा मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी यांना दिले असून या आंदोलनात शहराध्यक्ष अभय सूर्यवंशी, शहर सचिव अमोल गाजरे, शहर उपाध्यक्ष संतोष भोपळे, लखन पूरी, श्रीकांत बिरादार, पवन राठोड, रजत शेटकर, सचिन नागपूरने, कृष्णा भताने, अशोक कराड, दया डोंगरे, जरगर उबेद, विजय रेड्डी, नामदेव राठोड आदींनी सहभाग घेतला.

# दैनिक ‘सामना’चे वाडा तालुक्यातील प्रतिनिधी दिनेश यादव यांचे दुःखद निधन!



**वाडा/वार्ताहर**

वाड्यातील अभ्यासू पत्रकार व पालघर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे उपाध्यक्ष दिनेश यादव यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि.३ सप्टेंबर) संध्याकाळच्या सुमारास दुःखद निधन झाले. यादव यांना धुर्रधर आजाराने ग्रासले होते, त्यांच्यावर मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया झाल्या नंतर ते घरी परतले होते मात्र त्यांना पुन्हा त्रास उद्भवल्याने उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता त्यांनी दवा उपचाराला प्रतिसाद दिला नसल्याने शुक्रवारी सकाळी त्यांना घरी आणले मात्र या वेळी नियती समोर त्यांचे काही एक चालले नाही आणि त्यांच्या राहत्या घरी त्यांनी शेवटचा स्वास घेतला. दैनिक ‘सामना’ वृत्तपत्रासाठी ते वाडा प्रतिनिधी म्हणून काम करत होते. त्यांनी आपल्या लेखणीतून सर्वसामान्यांना नेहमीच न्याय देणाचा प्रयत्न केला, तर त्यांच्या परखड लिखाणाने शासकीय अधिकाऱ्यांमध्येही एक प्रकारचा धाक निर्माण झाला असला तरी सर्वसामान्यांसह अधिकारी, कर्मचारी तसेच राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात त्यांचे सलोख्याचे संबंध होते.यादव यांनी मराठी पत्रकार परिषदेच्या पालघर शाखेच्या स्थापनेसाठी मोलाचा वाटा उचलला होता. मराठी पत्रकार परिषदेचे खंदे समर्थक गेल्याने पत्रकारांमध्ये दुःखद भावना व्यक्त होत आहेत. यादव हे मनमिळाऊ, हसमुख व अत्यंत धार्मिक होते. दिनेश (दिंदा) यांच्या जाण्याने वाड्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# भोपणी येथे रिसोर्स फार्मर शिवार फेरीचे यशस्वी आयोजन



**देवणी/शकिल मनियार**

तालुका कृषी कार्यालय आणि पंचायत समिती कृषी विभाग यांच्या संकल्पनेतील रिसोर्स फार्मर शिवारफेरी चर्चासत्र कार्यक्रमाचे आयोजन भोपणी येथील प्रगतिशील शेतकरी गोविंदरावजी भोपणीकर यांच्या शेतामध्ये आयोजित करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लातूर तंत्रज्ञान तूर मध्ये उत्कृष्ट कार्य करणारे नामदेव पाटील बटनपूरकर उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, मांजरा कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सचिन दिग्रसे, कृषी महाविद्यालयाचे कृषी विद्यावेता अरुण कुटे, लातूर उपविभागाचे उपविभागीय कृषी अधिकारी आर एस कदम, प्रभारी उपविभागीय कृषी अधिकारी उदगीर संजय नाबदे, कार्यक्रमाचे आयोजक प्रगतीशील शेतकरी गोविंदरावजी भोपणीकर, माजी महिला व बालकल्याण सभापती कुषावर्ता बेळे, तालुका कृषी अधिकारी शिरीष कुमार धनबहादुर, कृषी अधिकारी पंचायत समिती बालाजी केदासे, बी. टी. एम.राहुल जाधव, एग्रीटेक फार्मर प्रोडूसर कंपनीचे संचालक अनंतराव गायकवाड, सकाळ ग्रोवन मार्टचे सर्व पदाधिकारी, इडऋया कंपनीचे जिल्हा वितरक कुलकर्णी, देवणी सकाळ अग्रोवन मार्ट पार्टनर गजानन भोपणीकर, प्रगतीशील शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी राजकुमार बिरादार, ओमकार मस्कले, अमर मुरके, संभाजी पाटील, उमेश बिरादार, बाबुराव कदम, राजपाल बिरादार, ड्रॅगन फ्रुट उत्पादक शेतकरी भारत भट, बिबीशन भोसले, संतोष कुसनूरे, श्रीरंग माने, बाळासाहेब मुके, गावचे कृषी सहाय्यक अंकुलवार साहेब, मोरे साहेब, सुजाता बनशेळकीकर मॅडम, श्रीमती माया श्रीनामे, पत्रकार प्रतिनिधी आणि उदगीर व देवणी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी जिल्ह्यातील दहा तालुके पैकी फक्त देवणी या तालुक्यांमध्ये चालत असलेल्या या उपक्रमास शुभेच्छा देऊन कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी शेतकऱ्यांच्या बांधावरती जाऊन त्यांचे सर्व प्रश्न सोडवत आहेत याबाबत समाधान व्यक्त करून असेच शेतकऱ्यांपर्यंत प्रती सेवेसाठी तत्पर रहावे अशा शुभेच्छा दिल्या. अरुण गुट्टे सव यांनी चालू ...पान ६ वर

# काँग्रेस पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न करू –अमर खानापुरे



**औसा/प्रतिनिधी**

युवक काँग्रेसच्या माध्यमातून आपण काँग्रेस पक्षात राजकारणाला सुरुवात केली अत्यंत कमी वयामध्ये पक्षाने आपल्यावर मोठी जबाबदारी दिली पदाला न्याय देण्याचे प्रामाणिक कार्य करीत राहीन यामुळे आता प्रदेश सरचिटणीस पदावर आपल्याला काम करण्याची संधी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे. मागील दीड वर्षात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्यामुळे आपण डिजिटल प्रणालीचा वापर करीत पक्ष कार्यकर्त्यांना ऑनलाईन मीटिंग मधून संपर्कात राहून तसेच शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड ऊर्जा मंत्री नितीन राऊत यांच्यासह इतर नेत्याकडून जनतेची कामे करता आली. येणाऱ्या काळात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष बसवराज पाटील, पालकमंत्री अमित देशमुख, जिल्हा अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्यासोबत समन्वयाने काम करून काँग्रेस पक्षाला बळकटी देण्याचा प्रयत्न करू असे प्रतिपादन नूतन प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे यांनी सत्कार समारंभानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले. तालुका काँग्रेस, युवक काँग्रेस, शिक्षक काँग्रेस,अल्पसंख्यांक ओबीसी, अनुसूचित जाती जमाती विभाग, आणि महिला काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी अमर खानापुरे यांच्या निवडीबद्दल औसा शहरात आगमन होताच मिरवणूक काढून भव्य सत्कार केला. यावेळी बोलताना अमर खानापुरे पुढे म्हणाले की, काँग्रेस हा धर्मनिरपेक्ष पक्ष असून सर्वांना सोबत घेऊन समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाला केंद्रबिंदू मानतो आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका असून प्रदेशाध्यक्षांच्या सूचनेनुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढविण्यात येथील त्यासाठी कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे सर्वसामान्य घटकापर्यंत घेऊन जाण्यासाठी अविरत काम करणे आवश्यक आहे. प्रदेश सरचिटणीस म्हणून आपण संघटना बांधणी व कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करीत राहावे. वाढत्या महागाईमुळे सध्या जनता त्रस्त झाली असून केंद्र सरकारला महागाई रोखण्यात अपयश आले आहे. इंधन दरवाढीने सामान्य नागरिक वैतागले आहेत शेतकरी शेतमजूर हा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी काँग्रेस पक्षाने अनेक वेळा आंदोलने करून सरकारचे लक्ष वेधले आहे. यापुढेही जनहितासाठी वेळोवेळी काँग्रेस रस्त्यावर उतरून केंद्र सरकारचे लक्ष वेधणार आहे असे सांगून सर्वांनी निष्ठेने पक्षाचे कार्य करीत राहावे असे आवाहन अमर खानापुरे यांनी केले. महाराष्ट्र राज्यातील सर्व सरचिटणीस पैकी सर्वात कमी वयात सरचिटणीस पदावर पक्षनेतृत्वाने आपल्याला संधी दिली असून त्यांच्या विश्वासाला कोणत्याही परिस्थितीत तडा जाऊ दिला जाणार नाही. अशी ग्वाही अमर खानापुरे यांनी पत्रकार परिषेदेत माहिती दिली. यावेळी तालुका अध्यक्ष दत्तोपंत सूर्यवंशी, शहराध्यक्ष शकील शेख, विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष हणमंत राचट्टे, ॲड. दिपक राठोड, सुलतान शेख, नगरसेवक अंगद कांबळे, नगरसेविका ॲड. मंजूषा हजारे, अदमखाँ पठाण, जयराज कसबे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी डिजिटल साक्षर टॅबच्या माध्यमातून शिकणार



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्याच्या वाडा तालुक्यात ‘पंचायत समिती वाडा, प्रथम इन्फोटेक फाऊंडेशन आणि ब्लू स्टार लिमिटेड’ यांच्या माध्यमातून २५ जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थी डिजिटल साक्षर टॅबच्या माध्यमातून शिकणार आहेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पाहता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी इयत्ता १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या मूलभूत क्षमता डिजिटल साधनांच्या माध्यमातून विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. वाडा जिल्हा परिषदेच्या शाळांमधील १ ली ते १० वीचे विद्यार्थी पहिल्यांदाच डिजिटल साक्षर टॅबच्या माध्यमातून भाषा, गणित, समाजशास्त्र आणि विज्ञान हे विषय शिकणार आहेत. त्याद्वारे जिल्हापरिषद शाळांतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम होऊन त्यांची कौशल्ये वृद्धिंगत होण्यास मदत होईल. समाजातील प्रत्येक घटकासाठी तंत्रज्ञानाचे शिक्षण हवे तेव्हा, हवे तसे आणि हवे तितके’ मिळण्यासाठी डिजिटल साक्षर हे एक पाऊल आहे. शालेय विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षर बनवणे आणि पारंपारिक अध्ययनातील डिजिटल दरी कमी करणे,’ हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. वाडा तालुक्यातील घोणसई, देवघर, बिलोशी, गोऱ्हे आणि केळठण या ५ केंद्रातील प्रत्येकी ५ अशा एकूण २५ शाळांसाठी टॅबचे वितरण जिल्हा परिषद शाळा देवघर येथे मंगळवारी (१सप्टें.) करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेम यादव, देवघर ग्रामपंचायतच्या माजी उपसरपंच रुचिता पाटील, देवघरचे केंद्रप्रमुख गुरुनाथ पष्टे, जामघर केंद्रप्रमुख गोविंद पाटील, शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूरमधील कोंडी येथे चहा पावडरमध्ये रंगाची भेसळ



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

चहा पावडरमध्ये रंग वापरत असल्याचे माहिती मिळाल्याने अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी गावच्या परिसरातील राहुटी येथे असलेल्या मे केजीटी कंपनी (गट क्रमांक १५५ स नं ५५/२ प्लॉट क्रमांक ६ मु.राहुटी पो.कोंडी ता उत्तर सोलापूर) येथे सुमारे २ लाख ४० हजार रुपयांचा दोन हजार किलो चहा पावडरचा साठा जप्त केला आहे. त्यानंतर जप्त चहा पावडरचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त प्रदीप राऊत यांनी सांगितले. कोंडी येथील राहुटी परिसरात मे. केजीटी कंपनीमध्ये चहा पावडरमध्ये रंग मिसळण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. त्यानुसार अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर ...पान ६ वर

# बनावट कागदपत्रांच्या आधारे इमारत उभारणाऱ्या बाप-लेकाला बेड्या; तर मुख्य आरोपी फरार

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी महानगरपालिकेची बनावट बांधकाम परवानगीसह असेसमेंट नोटीस आणि मूळ जमीन मालक यांचे बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करून इमारतीमधील २४ दुकाने आणि ३४ सदनिकांची मूळ मालकांना अंधार ठेवून ५ कोटी रूपयांत विक्री करणाऱ्या बाप-लेकाच्या जोडीला शांतीनगर पोलिसांनी दीड वर्षानंतर अटक केली आहे. किशोर रतिलाल सूचक, कुणाल सूचक अशी अटक केलेल्या बाप-लेकांची नावे तर भरत सूचक हा मुख्य आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. भरत सूचक हा भिवंडीतील नजराणा कंपाऊंड परिसरात राहणार आहेत. तर अटक आरोपी बाप-लेक ठाण्यात राहतात.







इद्रिस अब्दुल हमीद शेख (४०) यांची वडिलोपार्जित जमीन भिवंडीतील टेमघर-पाईपलाईन भागात मुख्य रस्त्यावर आहे. हि जमीन इद्रिसच्या वडिलांनी बांधकाम विकासक भरत सूचक यास भागीदारी करार करून दिली होती. मात्र इमारत उभारतांना २००१ साली मूळ मालकाला डावलून बांधकाम सुरु केले. तसेच पूर्वीच्या चाळीतील भाडेकरूंनाही डावल्याने १३ नोव्हेंबर २००१ रोजी शांतीनगर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली होती. तरीही मुख्य आरोपी भरत सूचक आणि दोघा आरोपी बाप लेकांनी आपसात संगनमत करून मूळ जमीन मालकांच्या नावाने बनावट कुलमुख्यतर पत्र, साठेकरार करून त्यावर बनावट सह्या केल्याचे निष्पन्न झाले होते. या दरम्यान आरोपींनी दोन मजली आणि त्यांनतर आणखी एक मजला अशी तीन मजली इमारत पालिकेची बनावट परवानगी व इतर इतर कागदपत्र तयार करून उभारली आहे. यामुळे जमीन मालक इद्रिस यांनी २००९ साली लोकआयुक्तकडे धाव घेऊन घडलेल्या प्रकाराबाबत लेखी पुरावे सादर केले. यावर सुनावणी होऊन इमारत ...पान ६ वर